



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ७१ * नांदेड * सोमवार, दि. १६ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# प. बंगालसह ५ राज्यांतील विधानसभा निवडणुका जाहीर; दोन टप्प्यात मतदान

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** देशातील ५ राज्यांत विधानसभा निवडणुकांचं रणशिंग फुंकलं जात असून, केंद्रीय निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत निवडणुकांची घोषणा केली. देशाचं लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालसह तामिळनाडू, आसाम, पुद्दुचेरी आणि केरल राज्यात निवडणुका होत आहेत. केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली. विशेष म्हणजे या ५ राज्यांच्या निवडणुकांसह महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी मतदारसंघातील पोटनिवडणुकांचीही तारीख जाहीर करण्यात आली. त्यानुसार प. बंगालमध्ये दोन टप्प्यात निवडणुका होत असून, २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

गेल्या काही दिवसात निवडणूक आयोगाने सर्व राज्यांचा दौरा केला, तयारीचा आढावा घेतला. आयोगाने

## ४ मे रोजी मतदान

सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची भेट घेतली, त्यांच्या सूचनांचा स्वीकार केला. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, IG, DG यांची भेट घेतली. प्रशासनाने 'एसआयआर'साठी केलेल्या कामगिरीबद्दल बीएलओचे अभिनंदन केल्याचं ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं. निवडणुका होत असलेल्या पाचही राज्य भौगोलिक आणि सांस्कृतिक भारताच्या विविधतेचं प्रतिनिधित्व करतात, असे म्हणत त्यांनी मतदारसंख्या आणि मतदान कर्मचारी, यंत्रणा याबाबत माहिती दिली.

आसाममध्ये सर्व १२५ मतदारसंघासात एकाच टप्प्यात, केरळमधील १४० विधानसभा आणि पद्दुचेरीतील ३० जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. या तिन्ही राज्यात ९ एप्रिल रोजी



मतदान आणि ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. तर तामिळनाडूतील २३४ विधानसभेसाठी देखील एकाच टप्प्यात २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. मात्र, पश्चिम बंगालमध्ये २९४ विधानसभा मतदारसंघासाठी दोन टप्प्यात १५२ आणि १४२ मतदारसंघात अनुक्रमे २३ आणि २९ एप्रिल मतदान होणार आहे. या सर्व विधानसभा निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी लागणार आहेत.

### २०२१ मध्ये झाल्या होत्या निवडणुका

देशात निवडणुका जाहीर करण्यात आलेल्या पाचही राज्यांतील विधानसभांचा कार्यकाळ मे महिन्यात संपुष्टात येत आहे. गत २०२१ मध्ये या राज्यांमधील निवडणुकांची घोषणा २६ फेब्रुवारी रोजी करण्यात आली होती. त्यावेळी प. बंगालमध्ये ८ टप्प्यांत निवडणुका झाल्या, आसाममध्ये ३ टप्पे तर तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरीमध्ये एकाच टप्प्यात मतदान झाले होते.

### १७.४ कोटी मतदार, २५ लाख कर्मचारी

देशाच्या ५ राज्यातील मतदारांची संख्या एकूण १७.४ कोटी एवढी आहे, तर ८२४ एकूण विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदान प्रक्रियेसाठी एकूण मतदान केंद्रांची संख्या २.१९ लाख असून एकूण कर्मचारी २५ लाख कार्यरत आहेत, अशी माहितीही आयोगाने दिली.

# बारामती अन् राहुरी पोटनिवडणूक जाहीर; २३ एप्रिलला मतदान

**मुंबई (प्रतिनिधी) –**राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभेच्या जागेवर पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणा केली असून संपूर्ण वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. निवडणूक आयोगाने यासंदर्भातील घोषणा केली आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. तर भाजप आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने राहुरी विधानसभा मतदारसंघात निवडणूक होणार आहे. पश्चिम बंगाल, आसाम,



तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि केरळमध्ये विधानसभा निवडणुकांचं बिगुल आज वाजलं. त्यासोबतच महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुका देखील जाहीर झाल्या आहेत. २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहे.

महानगरपालिकेची आज पहिली सभा

# भाजपच्या ५ स्वीकृत सदस्यांसह अन्य पक्षांच्या सदस्य घोषणेची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी) –**येथील महापालिकेच्या महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली पहिली सर्वसाधारण सभा सोमवार, दि. १६ मार्च रोजी होणार आहे. सभेतील ४ विषयांवरील चर्चेसह आठ स्वीकृत सदस्यांची निवड होणार आहे. यात सत्ताधारी भारतीय जनता पार्टीच्या पाच स्वीकृत सदस्यांच्या नावांसह अन्य पक्षातील सदस्यांची घोषणा होण्याची शक्यता आहे.

नांदेड वाघाळा शहर महापालिकेतील स्वीकृत सदस्य पदाचा मुहूर्त लागला. १३ मार्चपर्यंत सत्ताधारी भाजप- शिवसेना गटाला पाच, काँग्रेस-वंचित बहुजन आघाडीला दोन तर एमआयएम पक्षाला एक अशा एकूण आठ स्वीकृत सदस्यांचे नामनिर्देशन (को-आपटेड) दाखल करावयाचे होते. विरोधी पक्षातील काँग्रेस-वंचित बहुजन आघाडी यांनी मुन्ना अब्बास, अ‍ॅड. शेख बिलाल तर एमआयएम पक्षाकडून अ‍ॅड. मोहम्मद नासेर यांची नामनिर्देशन त्यांच्या गट नेत्यांकडून आयुक्तांकडे सादर करण्यात आले होते. परंतु भारतीय जनता पक्षाच्या पाच स्वीकृत सदस्यांचे नामनिर्देशन बंद लिफाफ्यात त्या त्या पक्षाच्या गटनेत्याकडून मनपा आयुक्तांकडे देण्यात आले आहेत. त्यांनी मात्र अंतर्गत कलह वाढू नये यासाठी त्यांची नावे जाहीर न करता गुप्त ठेवली आहेत. महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभा दि. १६ मार्च रोजी होणार आहे. या सभेत चार विषय ठेवण्यात आले आहेत. त्यात गत इतिवृत्ताला मान्यता देणे, स्थायी समितीवर १६ सदस्य तर पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण तथा महिला व बालकल्याण समितीवर ११ सदस्यांची निवड तसेच भारतरत्न तथा माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा नांदेड शहरात पुतळा उभारण्याचा प्रस्ताव देखील या सभेत सादर होणार आहे.

स्वीकृत सदस्य पदाच्या नामनिर्देशनासाठी सत्ताधारी भारतीय जनता पार्टी व शिवसेना पक्षाने पाळलेली गोपनीयता मात्र नागरिकांसमोर प्रश्न उपस्थित करीत आहे. भाजपकडून कोणत्या कार्यकर्त्याला स्वीकृत सदस्य पदाची लॉटरी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कीर्तनकाराचा मुलीला पक्कडीने चटके देत अमानुष अत्याचार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी) –** वारकरी संप्रदायाला काळिमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना पारनेर तासुक्यातील ढवळपुरी येथे उघडकीस आली आहे. ढवळपुरी येथील श्री दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आणि कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ (महाराज) याने एका १७ वर्षीय मुलीवर गेल्या पाच वर्षांपासून लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले आहे. केवळ अत्याचारच नव्हे, तर पीडितेला गरम लोखंडी पक्कडीने चटके देऊन अमानुष मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकारही समोर आला आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी इयत्ता आठवीत असल्यापासून आरोपीची तिच्यावर वाईट नजर होती. आरोपी आणि पीडितेच्या कुटुंबांचे घरोब्याचे संबंध होते, तर पीडितेचा भाऊ त्याच्याच संस्थेत कार्यरत होता. याच विश्वासाचा फायदा घेत नराधम यशवंतने २०२१ पासून पीडितेवर वारंवार अत्याचार केले. मुलीने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता 'मी दोन हाफ मर्डर केलेले आहेत, कोणाला सांगितले तर तुझ्या कुटुंबाला संपवून टाकीन,' अशी धमकी देऊन त्याने तिला दहशतीत ठेवले होते.

# महाराष्ट्रावर पावसाचा '७२ तासांसाठी येलो अलर्ट'

**मुंबई (प्रतिनिधी) –** मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्रामधील वातावरणात मोठा बदल जाणवत असून उन्हाचा तडाखा वाढला आहे. गेल्या आठवडाभरात राज्यातील बहुतांश भागात तापमानात ३ ते ४ अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. काही जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान चाळीशी पार गेल्याने हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. उष्ण आणि दमट हवामानामुळे नागरिकांना उन्हाचा त्रास जाणवत आहे.

राज्यातील किनारपट्टी भाग, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या सर्व भागांमध्ये उष्णतेचा प्रभाव दिसून येत आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यांमध्ये उष्ण व दमट हवामानाचा प्रभाव कायम आहे. मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांतही तापमानात वाढ नोंदवली गेली आहे. तर विदर्भातील नागपूर आणि अमरावती भागात उन्हाची तीव्रता अधिक आहे.



७ मार्च रोजी राज्यातील हवामान स्थितीचा आढावा घेतला असता उष्णतेचे प्रमाण वाढलेले दिसून आले. पुढील ७२ तासांसाठी मुंबईसह उत्तर कोकण भागात यलो अलर्ट कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. उन्हाळा अजून तीव्र होण्याचा अंदाज असून पुढील काही दिवस तापमान वाढण्याची शक्यता आहे.

# बीडमधील धक्कादायक प्रकार; अल्पवयीन विवाहितेला घरातून उचलून नेत अत्याचार

**बीड (प्रतिनिधी) –**बीडमध्ये पुन्हा एकदा मानवतेला काळिमा फासणारी घटना घडली आहे. बीड तालुक्यातील एका गावात अल्पवयीन तरुणीवर अत्याचार करत तिला गावच्या चावडीत बांधून ठेवण्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या पीडित तरुणीचा एक व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. पोलीस तपासादरम्यान ही तरुणी अल्पवयीन असून ती विवाहित असल्याचं समोर आले आहे.

पीडित तरुणी आपल्या पतीसोबत रात्री घरात झोपली असताना आरोपीने घरात घुसून तिला गावाबाहेर नेत तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिला गावच्या चावडीवरील खांबाला बांधून ठेवले गेले. हा प्रकार ग्रामस्थांच्या सकाळी निदर्शनास आला, त्यानंतही बराचवेळ तिच्याकडे कोणी लक्ष दिले नाही. अखेर नातेवाईकांकडून पीडितेची सुटका करण्यात आली. पोलिसांनी याची गंभीर दखल घेत वैभव पटेकर नामक व्यक्तीवर गुन्हा दाखल करून अटक केली. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही घटना १० मार्च रोजी घडली होती. मात्र, पीडित मुलीच्या नातेवाईकांनी भीतीपोटी दोन दिवस ही घटना लपवून ठेवली होती. अखेर दोन दिवसांनी मुलीने आई आणि मामासोबत पिंपळनेर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली होती. यानंतर हा धक्कादायक प्रकार उघड झाला. पोलिसांनी आरोपी वैभव पटेकर याला ताब्यात घेतले आहे.

# नेपाळमध्ये भारतीय यात्रेकरूंची बस दरीत कोसळली; ७ जणांचा मृत्यू


**नेपाळ (वृत्तसंस्था)–** नेपाळच्या गंडकी प्रांतातील गोरखा जिल्ह्यात शनिवारी रात्री भारतीय यात्रेकरूंना घेऊन जाणारी बस दरीत कोसळली. यात सात जणांचा मृत्यू झाला तर सात जण जखमी झाले. हे प्रवासी मनकामना मंदिरातून परतत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाविकांना घेऊन जाणारी एक मायक्रोबस मनकामना मंदिरातून परतत असताना रस्त्यावरून घसरून २०० फूट खोल दरीत कोसळली. पोलिसांनी सांगितले की, बसमध्ये डझनभराहून अधिक प्रवासी होते.

गोरखा जिल्हा वाहतूक पोलीस कार्यालयाचे प्रमुख सूरज अर्याल यांनी सांगितले की, मृतांमध्ये दोन महिला आणि पाच पुरुषांचा समावेश आहे, हे सर्व भारतीय नागरिक आहेत. जिल्हा पोलीस प्रमुख भरत बहादूर बीके यांनी दिलेल्या माहितीनुसार मृतांची ओळख मुथु कुमार (५८), अनामलिक (५८), मीनाक्षी (५९), शिवगामी (५३), विजयल (५७), मीना (५८) आणि तमिलारासी (६०) अशी आहे.

इलेक्ट्रिक बसचा चालक अपघातात सुखरूप बचावला, तर त्याचा सहाय्यक जखमी झाला.




**नांदेड –** केंद्रीय अर्थसंकल्प सुरू असताना प्रवेशद्वाराच्या बाहेर काँग्रेस पक्ष व त्यांचे नेते खा.राहुल गांधी यांनी विरोधी पक्षातील २० खासदारांनी चहापार्टी केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने आयटीआय कॉर्नर येथे निषेध व्यक्त करण्यात आला. त्यावेळी महानगराध्यक्ष मा.आ. अमर राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले, दिलीप कंदकुर्ते, विजय येवनकर, नगरसेवक अभिषेक सौदे, वैजनाथ देशमुख, साहेबराव गायकवाड, प्र. सतीष बस्वदे, शितल खांडिल, मंडळ अध्यक्ष भालचंद्र पवळे, महेंद्र पिंपळे. युवा मोर्चा अध्यक्ष शशिकांत क्षीरसागर, पिंटू पाटील यांच्यासह आदी. (छाया : करणसिंह बैस, नांदेड)




# युद्ध आखातात, झळ भारतात; सिंचन साहित्याच्या दरात ३५ ते ४० टक्क्यांची वाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** संपूर्ण जगाचं लक्ष लागून राहिलेल्या इराण आणि इस्त्रायल-अमेरिका यांच्यातील युद्ध दिवसागणिक अधिक तीव्र होताना दिसत आहे. आखाती देशांमधील युद्धाचा थेट परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होत असून सर्वसामान्यांनाही त्याची झळ सोसावी लागत असल्याचे चित्र आहे. अशातच आता या युद्धाचा थेट परिणाम शेती क्षेत्रावरही पडू लागला.

कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने शेतीसाठी लागणाऱ्या विविध सिंचन साहित्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. कच्चे तेल रिफायनरी करताना त्यातून निघणाऱ्या घटकातून सिंचनचे पाईप निर्मिती होते. या कच्च्या मालाचा पुरवठा थांबल्याने तृषार सिंचन, ठिबक सिंचन संच, पीव्हीसी पाईप, मोटार पंप तसेच, मोटारपंप केबल यांच्या किमतीत तब्बल ३५ ते ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ


**गोदातीर समाचार**

संपादक
**केशव घोणसे पाटील**

# गोपनीयतेचा मूलभूत अधिकार हरवतोय!

मोबाईल आणि आधार कार्ड यांचा व्यवहारामध्ये वापर अतिप्रमाणात होत असल्यामुळे कोणत्याही व्यक्तीची वैयक्तिक माहिती आता सुरक्षित राहिलेली नाही. सर्व शासकीय योजनांसाठी या दोन्ही बाबींची आवश्यकता आहे. एवढेच नव्हे तर एखादं सामान मागवायचे असेल तर ऑनलाईन पद्धतीमध्ये सुद्धा सदरील माहिती भरावी लागते. यामुळे खाजगी कंपन्यांकडेसुद्धा प्रत्येकाची माहिती संकलित होते आहे. याचा गैरउपयोग देखील अनेक वेळा होत असल्याचे आपल्याला दिसते. भविष्यामध्ये याचे वाईट परिणाम होण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही, म्हणून हे टाळण्यासाठी यापूर्वीच २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने गोपनीयतेच्या हक्काला मूलभूत अधिकार म्हणून घोषित केल्यानंतर या संकल्पनेने अनेक टप्पे पार केले आहेत. न्यायमूर्ती श्रीकृष्ण समितीने तयार केलेल्या विधेयकाने देशभरातील लक्ष वेधले. मात्र, अनेक वर्षांच्या दिरंगाईनंतर केंद्र सरकारने डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण अधिनियम २०२३ आणला. याच संदर्भात नियम २०२५ चा मसुदा सध्या सार्वजनिक सल्लामसलतीसाठी प्रसिद्ध करण्यात आला आहे. अंतिम रूप दिल्यानंतर हे नियम डेटा संरक्षणासाठीची एक ठोस प्रणाली तयार करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतील. नियमांचा उद्देश माहिती धारक, म्हणजे डिजिटल युजर्सना, त्यांच्या वैयक्तिक डेटावर अधिक नियंत्रण देणे आहे. याशिवाय डेटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडिया मार्फत एक स्वतंत्र अनुपालन यंत्रणा निर्माण करण्याचा विचार आहे. डिजिटल युगामुळे वैयक्तिक डेटा मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक क्षेत्रात आला आहे, ज्यामुळे व्यक्ती अधिक असुरक्षित झाली आहे. आता काही मूलभूत नियम निश्चित करण्यात आले आहेत, ज्यात डेटाच्या संकलनासाठी वैयक्तिक संमती अत्यावश्यक करण्यात आली आहे. डेटा वापरासाठी व्यक्तीला स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे. व्यक्तीला त्यांचा डेटा काढून टाकण्याचा अधिकार असेल, तसेच कोणताही डेटा अनिश्चित काळासाठी साठवून ठेवता येणार नाही. बालक आणि दिव्यांग व्यक्तींसंदर्भातील डेटावर अधिक कडक नियम लागू करण्यात आले आहेत. हे बदल स्वागतार्ह आहेत, पण या नियमांमधील अंमलबजावणी यंत्रणेमुळे काही शंका निर्माण झाल्या आहेत. डीपीबीआय एक स्वतंत्र संस्था असल्याचा दावा केला जात आहे, पण त्याचे सदस्य मंत्रिमंडळ सचिवालयाच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत नियुक्त केले जाणार आहेत. याशिवाय, सदस्यांच्या सेवा अटी सरकार ठरवणार असल्याने या संस्थेच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. नियमांमध्ये व्यक्तीला जितक्या सहजतेने संमती देता येईल, तितक्याच सहजतेने ती परत घेण्याचा अधिकार असेल, असे सांगण्यात आले आहे. मात्र, डेटा फिडुशिअरी म्हणजे डेटा हाताळणाऱ्या कंपन्यांना, शेवटच्या परस्पर संवादापासून तीन वर्षांपर्यंत डेटाचा साठा ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे. याशिवाय दोन महत्त्वाच्या गोष्टींवर अजूनही स्पष्टता नाही. एक म्हणजे एखाद्या डेटा गळतीच्या घटनेबाबत ७२ तासांच्या आत माहिती द्यावी लागणार आहे. मात्र, या नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी विश्वासार्ह अंमलबजावणी यंत्रणा नाही आणि दुसरे म्हणजे भारतीय ग्राहकांच्या वैयक्तिक डेटाचा कोणत्या देशांना प्रवेश असेल, याबाबत कोणतीही स्पष्टता नाही. सार्वजनिक चर्चेनंतर सरकारने नियम अंतिम करताना या मुद्द्यांवर विचार करणे अत्यावश्यक आहे. गोपनीयतेचा मूलभूत अधिकार जरी कायद्यात समाविष्ट असला तरी त्याचे रक्षण करण्यासाठी सक्षम सुरक्षा रेषा आवश्यक आहेत. याशिवाय डेटा गळतीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर अंमलबजावणी यंत्रणा उभी करणे आणि सीमापार डेटा प्रक्रियेसाठी पारदर्शक नियम तयार करणे ही काळाची गरज आहे. शासनाद्वारे स्थापित संस्थेला खऱ्या अर्थाने स्वायत्त ठेवण्यासाठी नियुक्ती प्रक्रिया आणि सेवा अटी यामध्ये सरकारच्या हस्तक्षेपाला मर्यादा घालणे आवश्यक आहे. डिजिटल युगात गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी हे नियम महत्त्वाचे पाऊल आहेत, पण सरकारने सुरक्षेच्या सर्व रेषा निश्चित केल्याशिवाय नागरिकांचा डेटा खरोखरच सुरक्षित राहील का, हा प्रश्न अनुत्तरितच राहील.

# महायोध्दा मावळाधिपती राजे मल्हारराव होळकर



मराठी सरदारांना मराठी राज्याचा पंतप्रधान होता येत नसेल तर, आम्ही स्वतःचे स्वराज्य निर्माण करू. महाराज मल्हारराव होळकर यांचा जन्म १६ मार्च १६९३ ला होळ या गावी झाला. त्यांचे वडील खंडूजी वीरकर हे मूळचे पुण्याजवळील वाफगावचे होते. पुढे ते फलटण जवळील नीरा नदीच्या काठी होळ इथे येऊन राहिले. त्यावरून त्यांना होळकर या नावाने सर्व ओळखू लागले. मल्हाररावांचे वडील खंडोजींच्या मृत्यूनंतर मल्हाररावांचे बालपण खानदेशातील तळोदा येथील भोजराज बारगळ मामाकडे गेले. भोजराज बारगळ हे कदम बांडे यांच्या सैन्यात २५ स्वाराचा नायक होते. पुढे१७०१ ते १७०८ पर्यंत मामाच्या सैन्यात मल्हाररावांना सैनिकी शिक्षण मिळाले.डिसेंबर १७१८ पासून कदमबांडे यांच्या सैन्यात मल्हारराव शिलेदार म्हणून काम करू लागले. जून १७२४ ला मल्हाररावांची कामगिरी पाहून पेशव्यांकडून त्यांना इंदोर ठाणे बक्षीस मिळाले.सन १७२५ ला पेशव्यांकडून ५०० स्वारांची मनसब मिळाली.

६ ऑगस्ट १७२७ ला ते अकरा जिल्ह्याचे सरंजामदार बनले. मार्च १७२८ला सरंजामदार या पदांमध्ये वृद्धी झाली. आणि २६ मे १७२८ इंदौर येथे त्यांनी स्वतंत्र राज्यकारभार सुरुवात केली आक्टोबर१७२८ माळवा प्रांतातील सरदेशमुखी आणि चौथाई वसुलीचे पूर्णाधिकार मल्हाररावांना प्राप्त झाले.३आक्टोबर १७३० ला माळव्यातील सर्वच अधिकारी म्हणून मल्हाररावांची नेमणूक झाली. दुसरे पंतप्रधान पेशवे बाळाजी विश्वनाथ नंतर मराठी राज्याचा पंतप्रधान होण्याची इच्छा सरदार मल्हारराव होळकरांची होती. परंतु मराठी राज्यात कोकणस्थ ब्राह्मणांचे वर्चस्व वाढल्यामुळे आणि पहिले छत्रपती शाहू निष्क्रिय निघाल्यामुळे मराठी सरदारांच्या कार्याची कदर करणारा कोणी शिल्लक नव्हता. त्यामुळे मराठी सरदारांना मराठी राजाचा पंतप्रधान होता येत नसेल तर आम्ही स्वतःचे साम्राज्य निर्माण करू अशी इच्छा मल्हारराव होळकरांची झाली. पुढे त्या दृष्टीने पावले उचलीत आईल्याबाई होळकर घरात आल्यानंतर गौतमाबाईचे नावे पेशव्यांकडून खासगीत जहागीर मिळवून घेतली.

२० जानेवारी१ ७३४ रोजी बाजीरावांनी गौतमाबाईच्या नावे उत्पन्नात २,९९,०,१० ची खासगी जहागीर दिली.ही जहागीर प्राप्त झाल्यानंतर इंदौर राजाची खऱ्या अर्थाने स्थापना झाली. त्यावेळेस अहिल्याबाईचे वय नऊ वर्षाचे होते. तरीपण तिने समजदारी आणि बुद्धिमत्तेच्या बळावर सासूसासऱ्यांची मन जिंकून घेतले होते. सासु गौतमाबाई तेजस्वी,धैर्यवान,साहशी, स्पष्ट वागणारी, हुशार होती. युद्धावर गेल्यानंतर राज्याचा कारभार गौतमाबाई पाहत असत. अहिल्याबाई घरात आल्यानंतर गौतमाबाईला राज्यकारभार सांभाळण्यास मदत झाली आणि पुढे अहील्याबाई स्वतः राज्यकारभार पाहू लागली. आईल्याबाई च्या सहकार्यामुळेच होळकरांच्या राज्य विस्तार होण्यास हातभार लागला. अहील्याबाईला १ डिसेंबर १७४५ ला पुत्ररत्न आणि १४ आगस्ट १७४८ कन्यारत्न झाले. मुलाचे नाव मालेराव आणि मुलीचे नाव मुक्ताबाई ठेवले.

मल्हाराव होळकर युध्दाहून परत आल्यानंतर अहील्याबाईना राज्यकारभार सांभाळण्याचे शिक्षण देत. देशाची स्थिती, राजनीती, व्यावहारिक शिक्षण, डावपेच, युध्दनीती, युद्धक्षेत्रावर बजावयाची कामगिरी, युद्धातील समस्या, राज्यकारभारातील समस्या, शासन प्रशासनातील अनेक गोष्टी महाराज मल्हारराव होळकररांकडून अहिल्याबाई शिकत होत्या. महाराज मल्हारराव होळकर यांनी पत्नी गौतमाबाई आणि सून अहील्याबाई यांना तीर्थयात्रा करण्यासाठी पाठवीत, अहिल्याबाई घोड्यावर बसून तीर्थयात्रेच्या निमित्ताने राज्यात फिरूनी येते त्यामुळे राज्याची भौगोलिक सामाजिक व राजनीतिक स्थिती त्यांना जाणून घेता आली. महाराज मल्हाररावांबरोबर वीर खंडेराव युद्धावर जात असत. त्यावेळी राज्याचा महसूल वसूल करणे, न्याय देणं, धन, सैना, गोळा बारूद, रसद, तोफा, घोडा, बैल चाराचंदी इत्यादी सर्व कामे स्वतः अहिल्याबाई पाहात. अहिल्याबाईला इंदौर राज्याचीच नव्हे तर संपूर्ण भारताची माहिती होती. एका साधारण मेंढपाळाच्या मुलाने आपल्या इच्छाशक्ती व पराक्रमाच्या बळावर आपले स्वतःचे लोककल्याणकारी राज्य उभे केले. ज्यांनी माळव्याची सुभेदारी व इंदुरचे राज्य उभे करताना आपल्या हयातीत ५२ लढाया जिंकल्या, ज्यांच्या फ़क्त नावाने ही शत्रूंची छावणी व गावे ओस पडायची अशा महान जागतिक महायोद्धा म्हणजेच सुभेदार मल्हारराव होळकर होय...आज सर्व जगात होळकरशाहीच्या गौरवशाली इतिहासाचे आकर्षण आहे पण या सर्व झुंजार रणयोद्धांचे प्रेरणास्थान होते मल्हारराव होळकर.

मल्हारराव होळकर म्हणजेच होळकर साम्राज्य चे मुळ पुरुष होत. एक साधारण धनगर कुटुंबातील मुलगा स्वतःचे राज्य उभे करतो ही घटनाच भारताच्या इतिहासातील अनन्यसाधारण घटना आहे. मल्हारराव प्रचंड स्वाभिमानी, मुसद्धी व पराक्रमी होते.मल्हारराव होळकर हे पुरोगामी विचारांचे होते.आपला मुलगा खंडेराव स्वराज्यासाठी शहीद झाल्यावर आपल्या सुनेला अहील्याबाई यांना धर्माचे कायदे बाजूला ठेवून सती जाण्यापासून राखून राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी सोपवतात. एवढेच नव्हे तर आपली पत्नी गौतमाबाई यांचेकडे खासगी राज्यव्यवहार कोष सोपविला. मल्हारबा यांनी अहील्याई यांना राजकारण, अर्थकारण, प्रशासन या विषयात प्रशिक्षण देऊन उत्तर भारतात मराठा साम्राज्य संवर्धीत केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्य चा विस्तार करण्यासाठी मल्हारबानी अफगाण अटक पर्यंत आपल्या शौर्याने स्वराज्याचे भगवे झेंडे रोवले आहेत.

महायोद्धा अजिंक्यविर रणमार्तंड मावळाधिपती इंदौरनरेश थोरले श्रीमंत सुभेदार राजे मल्हारराव होळकर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**–शंकर नामदेव गच्चे**
जि.प. प्रा.शा.वायवाडी
ता.हिमायतनगर जि. नांदेड
मो. ८२७५३९०४१०

# जागतिक ग्राहक हक्क दिन

दरवर्षी साजरा होणारा जागतिक ग्राहक हक्क दिन हा दिवस ग्राहकांच्या अधिकारांविषयी जागरूकता वाढवण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. ग्राहकांना सुरक्षित, दर्जेदार आणि पारदर्शक सेवा मिळाव्यात, तसेच त्यांच्या तक्रारींना न्याय मिळावा यासाठी शासन विविध उपक्रम राबवत असते. महाराष्ट्रात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत ग्राहक हक्कांबाबत जनजागृती केली जाते.



ग्राहकांना बाजारपेठेत खरेदी करताना अनेकदा चुकीची माहिती, निकृष्ट दर्जाची उत्पादने किंवा फसवणुकीला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत ग्राहकांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी विविध अधिकार देण्यात आले आहेत. या अधिकारांची जाणीव असणे हीच ग्राहकांसाठी सर्वात मोठी ताकद ठरते.

**ग्राहकांना मिळालेले सहा मूलभूत हक्क**

ग्राहक संरक्षण व्यवस्थेनुसार ग्राहकांना सहा महत्त्वाचे हक्क प्रदान करण्यात आले आहेत . हे हक्क बाजारपेठेतील पारदर्शकता आणि न्याय्य व्यवहार सुनिश्चित करतात.

**१. सुरक्षिततेचा हक्क**

ग्राहकांना अशा वस्तू व सेवांपासून संरक्षण मिळण्याचा अधिकार आहे ज्यामुळे त्यांच्या जीवनाला किंवा संपत्तीला धोका निर्माण होऊ शकतो.

**२. माहिती मिळण्याचा हक्क**

वस्तू किंवा सेवांची गुणवत्ता, प्रमाण, किंमत, घटक, उत्पादनाची माहिती याबाबत ग्राहकांना संपूर्ण व अचूक माहिती मिळण्याचा अधिकार आहे.

**३. निवडीचा हक्क**

ग्राहकाला विविध पर्यायांमधून योग्य वस्तू किंवा सेवा निवडण्याचे स्वातंत्र्य असावे. जबरदस्तीने विक्री किंवा अन्याय्य व्यापार पद्धतीला प्रतिबंध आहे.

**४. ऐकून घेण्याचा हक्क**

ग्राहकांच्या तक्रारी योग्य मंचावर मांडण्याचा आणि त्या ऐकून घेण्याचा अधिकार ग्राहकांना दिला आहे.

**५. तक्रार निवारणाचा हक्क**

निकृष्ट वस्तू, चुकीची सेवा किंवा फसवणूक झाल्यास ग्राहकांना नुकसानभरपाई मागण्याचा व न्याय मिळवण्याचा अधिकार आहे.

**६. ग्राहक शिक्षणाचा हक्क**

ग्राहकांनी आपल्या हक्कांविषयी जागरूक असणे आणि फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी योग्य माहिती मिळणे आवश्यक आहे.

**सजग ग्राहक हीच खरी ताकद**

ग्राहकांनी वस्तू खरेदी करताना काही बाबींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. वस्तूंवरील प्रमाणित चिन्हे जसे की भारतीय मानक ब्युरो, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण, सारीज्ञ आणि खडज यांची नोंद असणे महत्त्वाचे असते.

तसेच पॅकेजिंगवरील उत्पादन तारीख, वापराची अंतिम तारीख आणि कमाल किरकोळ किंमत तपासणे गरजेचे आहे. ऑनलाईन खरेदी करताना अधिकृत संकेतस्थळांचा वापर करावा आणि ओटीपी किंवा पिनसारखी गोपनीय माहिती कोणालाही देऊ नये.

**तक्रार नोंदविण्याची सोपी पद्धत**

ग्राहकांना त्यांच्या तक्रारी ऑनलाईन पद्धतीने नोंदवण्यासाठी केंद्र सरकारने श–गरसीळींळ झ्रीेंरश्र ही प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. या पोर्टलवर लॉगिन करून ग्राहक तक्रार दाखल करू शकतात. आवश्यक कागदपत्रे अपलोड करून प्रकरण नोंदवता येते आणि त्यावर पुढील कार्यवाही केली जाते.

याशिवाय ग्राहकांना मदतीसाठी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन क्रमांक १८००-११-४००० किंवा १९१५(टोल–फ्री). व एरळश्र खऊ पलह–लरसेीं.ळप देखील उपलब्ध आहे.

ग्राहकांनी स्वतःच्या अधिकारांविषयी जागरूक राहून योग्य माहितीच्या आधारे व्यवहार केल्यास बाजारपेठ अधिक पारदर्शक आणि सुरक्षित बनू शकते. त्यामुळे सुरक्षित उत्पादने, आत्मविश्वासपूर्ण ग्राहक ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येक ग्राहकाने सतर्क राहणे आणि आवश्यकतेनुसार आपल्या अधिकारांचा वापर करणे गरजेचे आहे.

**सजग ग्राहक सक्षम समाज**

आधुनिक बाजारपेठेत ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू मानला जातो. ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांना न्याय मिळवून देणे आणि व्यापारातील पारदर्शकता वाढवणे या उद्देशाने भारतात ग्राहक संरक्षणासाठी सक्षम कायदे व यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

भारतामध्ये ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ लागू केला होता. बदलत्या तंत्रज्ञान, वाढत्या ई–कॉमर्स व्यवहार आणि डिजिटल बाजारपेठेच्या पार्श्वभूमीवर या कायद्याचे आधुनिकीकरण करून ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ लागू करण्यात आला. हा कायदा २० जुलै २०२० पासून देशभर प्रभावी झाला असून ग्राहकांच्या हक्कांचे अधिक व्यापक संरक्षण करण्यासाठी अनेक नवीन तरतुदी करण्यात आल्या आहेत.

ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ ची वैशिष्ट्ये नवीन कायद्यामुळे ग्राहक संरक्षणाची यंत्रणा अधिक मजबूत झाली आहे.

मध्यस्थी कक्षाची तरतूद जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय ग्राहक आयोगांशी मध्यस्थी कक्ष जोडण्यात आले असून तक्रारींचे जलद आणि समन्वयाने निराकरण करण्यासाठी ही पर्यायी विवाद निवारण यंत्रणा उपलब्ध आहे.

या कायद्यात प्रथमच ‘दिशाभूल करणारी जाहिरात’ स्पष्टपणे परिभाषित करण्यात आली आहे. अशा जाहिरातींसाठी दंड आणि कारवाईची तरतूद करण्यात आली असून ग्राहकांची फसवणूक रोखण्यावर भर देण्यात आला आहे.

**उत्पादनाचे उत्तरदायित्व**

निकृष्ट उत्पादनामुळे ग्राहकांना हानी झाल्यास उत्पादक, विक्रेते किंवा सेवा प्रदात्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. ग्राहक नुकसानभरपाईची मागणी करू शकतात.

**ई–कॉमर्स आणि डिजिटल व्यवहारांचे नियमन**

ऑनलाईन खरेदी वाढल्याने ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि डिजिटल व्यवहारांना देखील या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आले आहे, ज्यामुळे ऑनलाईन ग्राहकांचे हक्क अधिक सुरक्षित झाले आहेत.

**ग्राहक तक्रार निवारणाची यंत्रणा**

ग्राहकांना न्याय मिळवण्यासाठी तीन स्तरांवर आयोग कार्यरत आहेत :

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग 50 लाखांपर्यंतची प्रकरणे

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग 50 लाख ते छ२ कोटीपर्यंतची प्रकरणे

राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोग 2 कोटींवरील प्रकरणे

या आयोगांमुळे ग्राहकांना न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा तुलनेने सोप्या आणि जलद पद्धतीने न्याय मिळण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

डिजिटल युगातील ग्राहक संरक्षण

ई–जागृती (e-Jagriti) पोर्टल ग्राहकांच्या तक्रारींचे जलद आणि पारदर्शक निवारण व्हावे यासाठी भारत सरकारने ग्राहक न्यायव्यवस्थेचे डिजिटलायझेशन केले आहे. यामध्ये ई–जागृती (e-Jagriti) पोर्टल महत्त्वाची भूमिका बजावतात.

e-Jagriti ही ग्राहक न्यायालयांना संगणकीकृत करून एकमेकांशी जोडणारी प्रणाली आहे. या माध्यमातून जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय ग्राहक आयोगातील प्रकरणांची माहिती ऑनलाइन उपलब्ध होते. ग्राहकांना आपल्या तक्रारीची स्थिती, सुनावणीची तारीख, आदेश (orders) आणि कारणपत्र (cause list) इंटरनेटवर पाहता येते. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत पारदर्शकता वाढते आणि ग्राहकांना वेळेवर माहिती मिळते.

या पोर्टलद्वारे ग्राहकांना घरबसल्या ऑनलाइन तक्रार दाखल करणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, शुल्क भरने आणि प्रकरणाची स्थिती पाहणे शक्य होते. तसेच डचड आणि ई–मेलद्वारे प्रकरणाबाबतची माहितीही मिळते.

या डिजिटल प्रणालीमुळे ग्राहक न्यायव्यवस्था अधिक सुलभ, वेगवान आणि पारदर्शक झाली आहे. ग्राहकांना न्याय मिळवण्यासाठीची तक्रार निवारण प्रक्रिया अधिक कार्यक्षम झाली आहे.

**सजग ग्राहकांची गरज**

कायद्यांबरोबरच ग्राहकांची जागरूकता देखील तितकीच महत्त्वाची आहे. वस्तू खरेदी करताना पावती घेणे, उत्पादनाची माहिती तपासणे, ऑनलाइन व्यवहार करताना सावधगिरी बाळगणे आणि फसवणूक झाल्यास तक्रार नोंदवणे या बाबी प्रत्येक ग्राहकाने पाळणे आवश्यक आहे. कारण सजग ग्राहक हा सक्षम आणि न्याय्य बाजारव्यवस्थेचा पाया असतो.

**–वंदना थोरात**
वरिष्ठ सहायक संचालक
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय

# मातृभाषेतून शिक्षण ही काळाची गरज

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत.

मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते.

माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल.

इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही. उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते.

या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सिने कलाकारांची विविध ग्रामपंचायतींना भेट




**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा प्रसार तळागाळापर्यंत व्हावा तसेच ग्रामीण भागात विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने सिने कलाकारांनी नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना भेट देत विकासकामांची पाहणी केली.

या अंतर्गत अभिनेते संदीप पाठक व अभिनेत्री रसिका वेंगुर्लेकर यांनी १३ मार्च रोजी नांदेड तालुक्यातील ग्रामपंचायत नेरलीतर्फे बोंढार, देगलूर तालुक्यातील येरगी तसेच अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव महादेव येथे भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली. भेटीदरम्यान त्यांनी गावांमध्ये राबविण्यात आलेल्या पायाभूत सुविधा, वृक्षारोपण, पाणीपुरवठा व्यवस्था, स्वच्छता उपक्रम, घरकुल योजना तसेच ग्रामपंचायतींचे विविध अभिनव उपक्रम यांची माहिती घेतली. ग्रामपंचायत नेरलीतर्फे बोंढार येथे नूतन वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले तसेच वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. ग्रामपंचायत येरगी येथे नवीन ग्रामपंचायत इमारतीचे उद्घाटन करून जिल्हा परिषद शाळेला भेट देण्यात आली.

यावेळी कलाकारांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत गावकऱ्यांनाही संबोधित केले. तसेच ग्रामपंचायत पिंपळगाव महादेव ता. अर्धापूर येथे शुद्ध पाणीपुरवठा योजना, लोकसहभागातून उभारलेले मंगल कार्यालय, ज्येष्ठ नागरिकांसाठी तयार केलेला उद्यान, मुलांसाठी खेळाचे मैदान, डिजिटल अंगणवाडी व शाळा तसेच शाळेतील शिक्षणाच्या गुणवत्तेची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले. या भेटीदरम्यान पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, संबंधित तालुक्यांचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी तसेच ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

# 'दावत-ए- इफ्तार'च्या माध्यमातून सामाजिक एकोपा व बंधुभावाचा संदेश -आ. प्रतापराव पाटील चिखलीकर

**लोहा (प्रतिनिधी)** – रमजान या पवित्र महिण्यात उपवास केला जातो. त्यातून अल्लाहची उपासना केली जाते. हिंदू –मुस्लीम असा कोणताही भेदभाव केला जात नाही. गेल्या २७–२८ वर्षांपासून अविरतपणे या पवित्र महिन्यात दावत–ए–इफ्तार पार्टीचे आयोजन लोहा, कंधार शहरात केले जात आहे. यातून सामाजिक एकोपा, बंधुभाव अधिक वृद्धिंगत होतो. लोहा शहरातील सर्व जातीधर्माचे नागरिक गुण्यागोविंदाने एकत्रितपणे नांदतात ही या शहराची परंपरा आहे. यातून सामाजिक समतेचा संदेश दिला जातो, असे प्रतिपादन विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले

लोहा शहरात दरवर्षी प्रमाणे यंदाही आ प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोह्याचे उपनगराध्यक्ष करीम शेख यांच्या पुढाकाराने त्यांच्या निवासस्थानी दावत – ए– इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, बीडीओ कुलकर्णी, नगराध्यक्ष शरद पवार, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, छत्रपती धुतमल, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, गणेश बगाडे, सतीश निखाते, पंकज पवार, मारुती जंगले, तुकाराम दाढेल, राजेश बोडके, बालाजी खिल्लारे, निहाल अहमद, सलीम शेख, सिकंदर शेख, अनिल धुतमल, इमाम लदाफ यांच्यासह मुस्लीम बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दावत–ए–इफ्तार पार्टीच्या माध्यमातून सामाजिक एकोपा व बंधुभाव जोपासला जातो. गेल्या सत्तावीस– अठ्ठावीस वर्षा पासून दरवर्षी रमजान या पवित्र महिन्यात लोहा, कंधार येथे इफ्तार पार्टी दिली जाते.



रमजान ईदनिमित्त सर्व मुस्लिम, हिंदू बांधव एममकांना भेटून शुभेच्छा देतात. यातून बंधूभाव वाढीस लागतो. हा एकोपा अधिक वृद्धिंगत व्हावा असा आशावाद आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला.

यावेळी सर्वप्रथम नमाज अदा करण्यात आली. लोहा नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष करीम शेख यांनी सर्वांचे दस्ती, टोपी देऊन स्वागत केले.

रमजान ईदनिमित्त लोहा, कंधार शहरात हिंदू–मुस्लीम बांधवांमध्ये बंधूभाव वाढीस लागतो. याकरिता लोहा, कंधार शहरातील सर्व समाजातील बांधव आपुलकीने एकमेकांशी भेटून शुभेच्छा देतात.

## लोह्याचे प्रा. डॉ. अजिंक्य बगडे यांना सुवर्णपदक



**लोहा (प्रतिनिधी)** – कोल्हापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ, कोल्हापूरच्या दीक्षांत समारंभात श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा येथील भौतिकशास्त्र विभागातील तासिका तत्वावरील प्राध्यापक डॉ. अजिंक्य बगडे यांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली.

पीएच.डी. संशोधनाच्या काळात त्यांनी ८ संशोधन निबंध प्रकाशित, ९ पेटंट नोंदणी तसेच १६ विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन पेपर सादर करून उल्लेखनीय संशोधन कार्य केले आहे. त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना गोल्ड मेडलिस्ट रिसर्च एक्सलन्स अवॉर्ड हा प्रतिष्ठित सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

## मल्टीपर्पज हायस्कूल इमारतीच्या नुतनीकरणासाठी निधी द्या

### आमदार बोंढारकर यांची विधानभवनात मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड शहरातील मल्टीपर्पज हायस्कूल ही पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण देणारी अनेक वर्षांपासूनची जुनी शाळा आहे. सध्या या शाळेतील बहुतांश वर्गखोल्या पूर्णपणे मोडकळीस आल्या आहेत. त्यामुळे येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना अक्षरशः जीव मुठीत घेऊन शिक्षण घ्यावे लागत असल्याचा मुद्दा आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी विधानभवनात उपस्थित केला.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना त्यांनी सांगितले की, शाळेची इमारत जीर्ण झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना योग्य व सुरक्षित वातावरणात शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच या शाळेच्या इमारतीचे तातडीने नुतनीकरण करण्यात यावे. तसेच नवीन वर्गखोल्या उभारण्यासाठी शिक्षण विभागामार्फत निधीची तातडीने तरतूद करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली. विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि चांगल्या वातावरणात शिक्षण मिळणे ही आपली सर्वांची जबाबदारी असून शासनाने या बाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही आमदार बोंढारकर यांनी व्यक्त केली.

## रायझिंग स्टार शाळेमध्ये वार्षिक संमेलन उत्साहात

**बिलोली (प्रतिनिधी)** –तालुक्यातील कासराळी येथील रायझिंग स्टार इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

या वार्षिक संमेलनात शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर गीतांसह आकर्षक नृत्य सादर करीत नृत्याविष्कारांनी कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. लहानग्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे मोठा प्रतिसाद मिळाला आहे. हा कार्यक्रम प्रत्येक पालक व श्रोत्यांच्या पसंतीत उतरावा यासाठी प्रामुख्याने मुख्याध्यापिका सौ. अश्विनी हरडपकर, उपमुख्याध्यापिका सौ. अंजली ठक्करवाड या सोबतच प्रामुख्याने पोलीस पाटील तथा विधी तज्ज्ञ माधव ठक्करवाड आदी प्रयत्नशील होते.

सर्वप्रथम स्नेहसंमेलनाचे उद्घाटन स्कॉलर इंटरनॅशनल स्कूल मुखेडच्या संचालिका सौ. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापिका गुरुकुल पब्लिक स्कूल नायगाव येथील सौ. स्वाती संतोष कल्याण, सामाजिक कार्यकर्त्या सौ. रविना गजानन चव्हाण, प्रशासकीय सरपंच सौ. कविता संभाजी टोंपे, उपसरपंच कल्पना दंतापल्ले, बेळकोणी (बु.) च्या सरपंच सौ. शेषाबाई सूर्यवंशी, चिंचाळाचे प्र. सरपंच सौ. मनिषा डोकेवाड, रुद्रापूरच्या प्र. सौ. पंचफुला नलगोंडे होत्या.

# पीपल्समध्ये पाच ग्रंथांचा लोकार्पण सोहळा उत्साहात



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील पीपल्स कॉलेजच्या हिंदी विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवाद व पुस्तक लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला.

डॉ. वर्षा मोरे – पावडे लिखित 'हिंदी लेखिकाओं की आत्मकथाएं' आणि 'कैवारी', डॉ. मंजुषा कोल्हे यांचे 'जया जादवानी का समग्र साहित्य : एक मूल्यांकन', डॉ. स्मिता चालिकवार यांचे 'देवकीनंदन शुक्ल के साहित्य में मूल्यबोध' आणि प्रा. मनिषा वाघमारे यांचे 'सुशीला टाकभौरे का कहानी साहित्य' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

उद्घाटक प्रा. सतीश यादव यांनी आपल्या बीज भाषणात स्त्री साहित्याची दिशा व दशा यावर भाष्य केले. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव प्रा. श्यामल पत्की या होत्या. प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख संयोजक प्रा. भगवान जाधवर यांनी तर सूत्रसंचालन डॉ. मुकुंद कवडे यांनी केले.

यावेळी प्रथम सत्राच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक प्रा. रमेश कुरे होते. या सत्रात डॉ. गोविंद बुरसे व डॉ. बळीराम धापसे यांनी विचार मांडले. सूत्रसंचालन डॉ. भीमराव घोडगे यांनी तर डॉ. स्मिता चालिकवार यांनी आभार मानले.

द्वितीय सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. संदीप पाईकराव होते. या सत्रात डॉ. जयराम सूर्यवंशी व डॉ. गोविंद शिवशेट्टे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. प्रीती यादव यांनी केले, तर आभार प्रा. मनिषा वाघमारे यांनी मानले. समारोप सत्रात कोल्हापूर येथील डॉ. वर्षा सहदेव या प्रमुख अतिथी होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर होते. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. विजया उफाडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. अर्चना ठोके यांनी मानले.

## मेकअप आर्टिस्ट अस्मिता साबळे यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**कंधार (प्रतिनिधी)** –अस्मिता हुशारसिंग साबळे यांच्या मेकअप आर्टिस्ट क्षेत्रातील कामाची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

समाज प्रतिबिंब बहुद्देशीय संस्था व बीएसएफ बहुद्देशीय संस्था आणि उपेक्षित नायक न्यूज व संत कबीर बहुद्देशीय संस्था बुलढाणाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन नाशिकमध्ये करण्यात आले आहे.

सामाजिक, कृषी, क्रीडा, उद्योग, शैक्षणिक, संस्था, प्रशासकीय, कला व अन्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या ७० लोकांना हा महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. चित्रपट सृष्टीतील कलाकारांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा मे महिन्यात नाशिक येथे पार पडणार आहे, अशी माहिती कार्यक्रम आयोजक भूषण सरदार यांनी दिली.

# अस्मिता महिला लीग आयोजित क्रीडा स्पर्धेत पारडी शाळेचे यश

**लोहा (प्रतिनिधी)** –भारत सरकार, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय यांच्याकडून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त अस्मिता महिला लीग आयोजित नांदेड जिल्ह्यामध्ये भारतीय क्रीडा प्राधिकरण, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, खेलो इंडिया, माय भारत, युवा कार्य, क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने व सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या सहकार्याने ८ मार्च २०२६ रोजी अस्मिता महिला लीग स्पर्धेचे आयोजन सायन्स कॉलेज, नांदेड येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत पारडी शाळेने यश संपादन केले आहे.

२०० मीटर धावणे या स्पर्धेत शुभश्री बळीराम पवार, प्रथम ४०० मीटर धावणे –वेदिका विश्वनाथ मोरवले प्रथम, १०० मीटर धावणे– संगीता बबन मटके द्वितीय तर रागिनी गजानन डिकळे तृतीय, २०० मीटर धावणे –आरती प्रबत्ता पवार तृतीय क्रमांकाचे यश संपादन केले.




यावेळी स्पर्धेमध्ये पहिला, दुसरा व तिसऱ्या आलेल्या विजेत्या खेळाडूंना गृह रक्षक दलाचे पोलीस उपअधिक्षक अश्विनी जगताप, जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर, सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. शिंदे, सायन्स कॉलेजचे क्रीडा संचालक अश्विन बोरीकर, क्रीडा अधिकारी शिवकांता देशमुख, अॅथलेटिक संघटनेचे सचिव संजय बेथेवाड, प्रलोभ कुलकर्णी यांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती आंबलवाड, शिक्षण विस्तार अधिकारी विठ्ठल आचणे, केंद्र प्रमुख बी. टी. केंद्रे, सर्जेराव टेकाळे, बाबुराव फसमले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल डिकळे, बळीराम पवार, शाळेचे मुख्याध्यापक तथा क्रीडा शिक्षक माधव किसवे, फारुख शेख, विलास मंगनाळे, जी. एल. देशमुख, रमेश मरखेलकर, ज्योती कदम, मीनाक्षी वाडीकर, सुरेखा इंगोले, बी. वाय. चव्हाण, सुमनबाई डिकळे, गोविंद पाटील डिकळे, संभाजी पाटील पवार, सचिन गायकवाड, शरद पाटील पवार, हणमंत पवार, व्यंकट डिकळे, विठ्ठल देवकते, पाराजी पोले, प्रमोद पाटील, व्यंकट मोरवले, नांदेडचे क्रीडा अधिकारी बालाजी शिरसिकर, खो खो असोसिएशनचे सचिव रमेश नांदेडकर, राज्य पंच रूपेश चोपणे, विठ्ठल मरवळे, अक्षय निकम, कैलास पवार यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

## कैलास देशमुख गोरठेकर यांच्या वाढदिवसानिमित्त हभप गोविंद महाराज गायकवाड यांचे भारूड रंगले

**उमरी (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते, नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष तसेच नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक कैलास देशमुख गोरठेकर यांच्या वाढदिवसानिमित्त उमरी येथे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विनोदातून समाजप्रबोधन करणारे प्रसिद्ध भारुडकार ह.भ.प. गोविंद महाराज गायकवाड यांच्या भारूडाचा कार्यक्रम रंगला.

हा कार्यक्रम सोमवार, दिनांक १६ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता उमरी येथील मोंढा मैदान, गोरठेकर कॉम्प्लेक्स समोर मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. आपल्या भारूडाच्या माध्यमातून समाजातील विविध सामाजिक





प्रश्न, अंधश्रद्धा, व्यसनमुक्ती तसेच नैतिक मूल्यांबाबत जनजागृती करणारे ह.भ.प. गोविंद महाराज गायकवाड हे महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहेत. त्यांच्या भारूडातील विनोदी शैली, प्रभावी सादरीकरण आणि प्रबोधनात्मक संदेश यामुळे हा कार्यक्रम नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरणाला.

या कार्यक्रमासाठी येणाऱ्या महिलांकरिता विशेष बसण्याची व्यवस्था करण्यात आली असून, सर्व नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन के. डी. बॉस मित्र मंडळ, उमरीच्या वतीने करण्यात आले हाते. परिसरातील भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

### नांदेड लोकअदालतीत ऐतिहासिक तडजोड

## अपघातग्रस्त कुटुंबाला ८६ लाख रुपयांची नुकसान भरपाई

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा सत्र व न्यायालयात १४ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय लोकअदालती' मध्ये एक ऐतिहासिक निकाल समोर आला आहे. एका भीषण मोटार अपघाताच्या प्रकरणात पीडित कुटुंबाला टाटा विमा कंपनीकडून ८६ लाख रुपयांची भरघोस नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकअदालतीमध्ये ही सर्वात मोठी तडजोड मानली जात आहे.

एका रस्ते अपघातात कुटुंबातील मुख्य कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यामुळे हे कुटुंब उघड्यावर आले होते. गेल्या काही काळापासून हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित होते. मात्र, लोकअदालतीच्या माध्यमातून सामोपचाराने प्रश्न सोडवण्याच्या उद्देशाने जिल्हा न्यायाधीश माननीय तौशीकर यांच्या पॅनलसमोर हे प्रकरण ठेवण्यात आले. कायदेशीर लढा आणि यश या प्रकरणात



पीडित कुटुंबाच्या वतीने अॅड. शेख शकील बशीर (धनेगाव) यांनी अत्यंत प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांनी पीडित कुटुंबाची आर्थिक स्थिती आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता, जास्तीत जास्त नुकसानभरपाई मिळावी यासाठी भक्कम कायदेशीर मुद्दे उपस्थित केले. या प्रक्रियेत त्यांना अॅड. पंकज कसबे, अॅड.गौतम भद्रे आणि अॅड. मुद्दासिर यांनी मोलाचे सहकार्य केले.

विमा कंपनीच्या वतीने अॅड. ए. जी. कदम यांनी बाजू मांडली. दोन्ही बाजूंच्या वकिलांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आणि दीर्घ चर्चेनंतर, अखेर ८६ लाख रुपयांच्या विक्रमी रकमेवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

या लोकअदालतीमधील ही नांदेडमधील सर्वोच्च रकमेच्या तडजोडीपैकी एक ठरली आहे. अनेक वर्षे चालणाऱ्या कोर्ट–कचेऱ्यांपेक्षा लोकअदालतीमुळे पीडित कुटुंबाला त्वरित न्याय मिळाला, अशी प्रतिक्रिया अनेकांनी नोंदविली.

न्यायाधीश, वकील आणि विमा कंपनी यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे हा निकाल यशस्वी झाला. या निकालामुळे पीडित कुटुंबाने समाधान व्यक्त केले असून, अॅड. शेख शकील बशीर (धनेगाव), आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. लोकअदालतीमुळे सर्वसामान्यांना कशा प्रकारे दिलासा मिळू शकतो, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

# लिंबगाव महसूल मंडळात महाराजस्व समाधान शिबीर संपन्न; सोळा गावांतील नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)** –शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य समाधान शिबीर अभियान (टप्पा क्र. १) अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यातील दुसरे शिबिर लिंबगाव येथे उत्साहात पार पडले. विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे या शिबिराला परिसरातील १६ गावातील नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नांदेड उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ होते. याप्रसंगी त्यांनी प्रशासन लोकाभिमुख करण्यासाठी व शासकीय योजनांचा तळागाळातील जनतेला लाभ देण्यासाठी शासनाची एकाच ठिकाणी सर्व कामे होण्यासाठी हे शिबीर आयोजित केलेले आहे.

या शिबिरामध्ये ९६० डिजिटल सातबारा, ६४० आठ–अ उताऱ्यांचे वाटप, विविध प्रमाणपत्र वाटप, ६२१ अर्जदारांना व १५ जणांना संजय गांधी योजनेचा लाभ देण्यात आला आहे असे त्यांनी सांगितले. या शिबिरामध्ये महसूल विभाग, ग्रामविकास, आरोग्य, कृषी, भूमिअभिलेख, (मोजणी) तसेच दुय्यम निबंधक, प्राथमिक आरोग्य केंद्र, बाल विकास प्रकल्प विभाग, संगायो विभाग, पुरवठा विभाग, बचतगट विभागासह विविध शासकीय विभागांनी सहभाग घेतला. संबंधित विभागांच्या



अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारले.

तहसील कार्यालय, नांदेड यांच्या वतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात आले. यामध्ये ९६० ऑनलाईन डिजिटल सातबारा उतारे व ६४० आठ–अ उतारे, विविध प्रमाणपत्र ६२१, नागरिकांना देण्यात आले. तसेच १५ पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. याशिवाय फेरफार संदर्भातील अर्जही स्वीकारण्यात आले.

शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, सातबारा, ८–अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार संजय वारकड यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करण्यात येत असल्याचे सांगितले.

तसेच अकृषिक, जिवंत सातबारा, सामाजिक अर्थसहायाच्या योजना आदींची सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले. संजय गांधी निराधार योजनेचे दिव्यांग लाभार्थी यांनी दिव्यांग कार्ड (यूडीआयडी कार्ड) काढून घेऊन सादर करावे, असे आवाहन केले. नायब तहसीलदार सुनिल माचेवाड, स्वप्नील दिगलवार व पुरवठा निरीक्षक रवींद्र राठोड यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण केले.

कार्यक्रमास लिंबगावचे सरपंच कमलबाई कदम, जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख सीमा देशमुख, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, उपअधीक्षक भूमिअभिलेख बळवंत मस्के, तालूका आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण मुंडे, मेडिकल अधिकारी डॉ. पंडित डवले, शिक्षण विस्तार अधिकारी लता कवठेकर, विस्तार अधिकारी पंचायत राजू केंद्रे, बालविकास प्रकल्पाच्या श्रीमती पंडित, जि. प. हायस्कूल लिंबगावच्या मुख्याध्यापिका शेळके अदिची प्रमुख उपस्थिती होती.

CMYK

# प्रगतीमंत्र

## जॉब इंटरव्ह्यूमध्ये स्वत :बद्दल सांगण्याआधी समजून घ्या बिल गेट्सच्या या खास गोष्टी...

**आम्ही तुम्हाला नोकरी का द्यावी ? हा प्रश्न अनेकदा नोकरीच्या मुलाखतींमध्ये तरुणांना गोंधळात टाकतो. सर्वोत्तम तयारी असूनही, असा प्रश्न आल्यावर काय बोलावे हे त्यांना कळत नाही. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक आणि मायक्रोसॉफ्टचे सह-संस्थापक बिल गेट्स यांनी तरुणांसाठीची ही सर्वात मोठी समस्या सोडवली आहे. नोकरीच्या मुलाखती दरम्यान हा प्रश्न किती महत्त्वाचा आहे आणि तरुणांनी त्याचे उत्तर कसे द्यावे, हे त्यांनी स्पष्ट केले. आयुष्यात असंख्य तरुणांच्या मुलाखती घेतलेले बिल गेट्स तांत्रिक ज्ञान आणि कौशल्ये महत्त्वाची मानतात, परंतु उमेदवार आपली प्रेरणा, योग्यता, क्षमता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य मुलाखतकारांसमोर कसे सादर करतात हे महत्त्वाचे आहे.**



बिल गेट्स यांनी एनबीए स्टार स्टीफन करीच्या 'स्टेट ऑफ इन्स्पिरेशन' या यूट्यूब शोमध्ये कॉलेजमधून बाहेर पडलेल्या तरुणाची भूमिका साकारली. जर ते पहिल्यांदाच मायक्रोसॉफ्टमध्ये नोकरीसाठी अर्ज करत असतील तर त्यांनी मुलाखतीला कसे सामोरे गेले असते, हे त्यांनी दाखवून दिले. त्यानंतर त्यांनी तरुणांना वारंवार येणाऱ्या प्रश्नांचे प्रकार आणि त्यांनी कसे उत्तर द्यावे हे स्पष्ट केले. जेव्हा मुलाखतींमध्ये 'तुम्हाला का नोकरी द्यावी?' हा प्रश्न विचारला जातो तेव्हा उमेदवार बढाई मारतात आणि येथेच ते अपयशी ठरतात. बिल गेट्सचा असा विश्वास आहे की हा प्रश्न बढाई मारण्याबद्दल नाही, तर तुमचे मूल्य दाखवण्याची संधी प्रदान करतो. जर हा प्रश्न विचारला गेला तर, मुलाखतकार फक्त तुमच्या कामगिरीची यादी लक्षात घेत नाहीत तर त्यांना तुमच्या कौशल्यांचे आणि विचारांचे मूल्यांकन करायचे असते. जे भविष्यात कंपनीसाठी फायदेशीर ठरू शकते. 'मी कठोर परिश्रम करतो' किंवा 'मी टीमसोबत मिळून काम करतो, अशी अस्पष्ट उत्तरे देण्याऐवजी तुमच्या विशिष्ट कौशल्यांचा थेट कंपनीच्या गरजांशी संबंध जोडा. स्वतःला कंपनीच्या अल्पकालीन उद्दिष्टांमध्ये आणि दीर्घकालीन स्वप्नांमध्ये योगदान देऊ शकणारी व्यक्ती म्हणून सादर करा, असे बिल गेट्स म्हणतात.

## बस ड्रायव्हरचा मुलगा बनला आयएएस

### कोचिंग फी भरण्यासाठी कॅफेत केले काम, बिकट परिस्थितीतून मोइन बनला अधिकारी

**परिस्थिती काहीही असो, संघर्ष आणि कठोर परिश्रम करणारे कधीही हार मानत नाहीत. उत्तर प्रदेशातील एका छोट्या गावात राहणारा मोईन अहमदचीही अशीच कहाणी आहे. त्याची मोठी स्वप्ने होती पण सर्व बाबतीत मर्यादा येत होत्या. आयुष्याने त्याला पुन्हा पुन्हा मूळस्थितीत आणून आदळले. पण तरीही त्याने हार मानली नाही. ध्येय गाठेपर्यंत तो थांबला नाही. मोईन अहमदची यशोगाथा ही आवड, समर्पण आणि कठोर परिश्रमाची आहे, तसेच आयएएस अधिकारी बनण्याच्या दृढनिश्चयाची आहे...**



मोईन अहमदचा जन्म उत्तर प्रदेशातील मुरादाबाद जिल्ह्यातील जटपुरा गावात झाला. त्याचे वडील वली हसन यूपी रोडवेजमध्ये बस ड्रायव्हर आहेत आणि मोईनला चार लहान भाऊ आहेत. मोईन पाच भावंडांपैकी दुसरा आहे. म्हणूनच, त्याला लहान वयातच त्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव झाली. मोईनचे स्वप्न क्रिकेटपटू बनण्याचे होते आणि तो चांगला खेळलाही, परंतु त्याच्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्याला त्याचे स्वप्न सोडून द्यावे लागले. मोईन अहमदने गावातील सरकारी शाळेत शिक्षण घेतले. १२ वीनंतर, त्याने बी.एस्सी. प्रोग्राममध्ये प्रवेश घेतला, परंतु त्याच्यावर कौटुंबिक जबाबदाऱ्यादेखील होत्या. म्हणून, तो कॉलेजमध्ये असतानाच काम करू लागला. तो एका सायबर कॅफेमध्ये काम करत होता, जिथे त्याला UPSC परीक्षेबद्दल माहिती मिळाली. हळूहळू त्याचे लक्ष अभ्यास आणि सरकारी नोकरीकडे वळले. कॉलेजच्या काळात त्याने UPSC परीक्षा उत्तीर्ण होऊन सरकारी कर्मचारी होण्याचा निर्धार केला.

### सायबर कॅफेमध्ये काम करून UPSC कोचिंग फी भरली



मोईनने २०१६ ते २०१८ पर्यंत जवळ जवळ दोन वर्षे सायबर कॅफेमध्ये काम करून त्याच्या UPSC कोचिंग फी भरल्या. त्यानंतर त्याने UPSC कोचिंगसाठी दिल्लीला जाण्याचा निर्णय घेतला. यामुळे त्याला सायबर कॅफेमधील नोकरी सोडावी लागली. कुटुंबातील सर्व सदस्यांनी मोईनला पाठिंबा दिला. मोईनच्या नोकरी सोडण्याच्या निर्णयामुळे त्याचे वडील नाराज होते, त्यांना काळजी होती की तो अनिश्चित भविष्यासाठी चांगली नोकरी सोडत आहे. काही नातेवाईकांनी असेही म्हटले की तो त्याचे उज्ज्वल भविष्य धोक्यात घालत आहे.

### अपयश आणि 2.5 लाखांचे कर्ज

२०१९ मध्ये मोईन दिल्लीला गेला आणि त्याने स्वतःला UPSC तयारीसाठी पूर्णपणे समर्पित केले. सायबर कॅफेच्या नोकरीतून त्याने वाचवलेले पैसे पुरेसे नव्हते. म्हणून, मोईन अहमदने कोचिंगसाठी २.५ लाख रुपये कर्ज घेतले. तो प्रयत्न करत राहिला, पण प्रत्येक वेळी अपयशी ठरला. त्याने २०१९, २०२० आणि नंतर २०२१ मध्ये यूपीएससी सिव्हिल सर्व्हिसेस परीक्षा दिली, प्रिलिम्समध्येही पात्रता मिळवू शकला नाही. तरीही, त्याचा निर्धार अढळ राहिला.

### 296 वा रँक आणि आयएएस

प्रत्येक अपयशाने त्याला बळकटी दिली आणि त्याने त्याच्या कमकुवत बाजूंवर काम केले. त्याच्या आईने त्याला प्रेरणा दिली आणि त्याचे निकाल त्याच्या चौथ्या प्रयत्नात स्पष्ट झाले. २०२२ मध्ये मोईनने प्रिलिम्स, मेन्स आणि मुलाखतीच्या फेऱ्या एकाच वेळी पात्र ठरल्या. त्याने आयएएस अधिकारी होण्यासाठी यूपीएससी २०२२ च्या परीक्षेत २९६ वा रँक मिळवला. त्याला पश्चिम बंगाल कॅडरमध्ये नियुक्त करण्यात आले. त्याचा प्रवास फक्त त्याचा स्वतःचा नाही; तो असंख्य तरुणांसाठी प्रेरणा ठरला आहे.

## एसडीएम अन् तहसीलदार यांच्यात काय फरक आहे, कोण जास्त शक्तिशाली?

» एसडीएम कोण असतो ? : उपविभागीय दंडाधिकारी (एसडीएम) हा जिल्ह्यातील उपविभागाचा प्रशासकीय प्रमुख असतो. एसडीएमकडे जिल्हा दंडाधिकारी (डीएम) सारखेच अनेक प्रशासकीय अधिकार असतात, परंतु ते डीएमच्या मार्गदर्शनाखाली त्यांची कर्तव्ये पार पाडतात. यूपीएससी नागरी सेवा परीक्षेतून निवडलेले उमेदवार प्रशिक्षणानंतर एसडीएम बनतात. राज्य लोकसेवा आयोग (पीसीएस) परीक्षेनंतर त्यांची नियुक्ती देखील करता येते.

» एसडीएमची मुख्य कार्ये अशी : एसडीएम महसूल बाबतीत प्रथम श्रेणीचे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून काम करतात. ते जमिनीच्या मूल्यांकनापासून ते जमीन महसूल गोळा करण्यापर्यंतच्या प्रक्रियेवर देखरेख करतात. एसडीएम त्यांच्या क्षेत्रातील विविध विभागांच्या कामाचे समन्वय साधतात आणि कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यासारख्या विकास योजनांचे निरीक्षण करतात. एसडीएमकडे दंडाधिकारी अधिकार देखील आहेत. पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावतात. उपविभागातील विविध सरकारी विभागांमध्ये समन्वय राखणे ही देखील एसडीएमची महत्त्वाची जबाबदारी आहे.

» तहसीलदार कोण असतो ? : तहसीलदार हा महसूल प्रशासनातील एक महत्त्वाचा अधिकारी असतो, जो जिल्ह्याच्या तहसील किंवा तालुका पातळीवर प्रशासकीय आणि महसूल कार्यांसाठी जबाबदार असतो. नायब तहसीलदाराला तहसीलदार पदावर बढती दिली जाते. राज्य लोकसेवा आयोग (पीसीएस) द्वारे निवडलेले अधिकारी तहसीलदार बनतात.

» तहसीलदाराची मुख्य कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या : तहसीलदाराची प्राथमिक भूमिका जमीन महसूल आणि सरकारला देय असलेल्या इतर रकमा गोळा करणे आहे. जमिनीच्या नोंदी, पीक डेटा आणि महसूल नोंदी यासारख्या जमिनीच्या नोंदी राखण्याची मुख्य जबाबदारी. नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्यांना मदत आणि आवश्यक मदत पुरवण्याची जबाबदारी देखील तहसीलदाराची आहे.

» तहसीलदार सरकारला जमीन महसुलात सूट किंवा निलंबनाची शिफारस करू शकतात आणि प्रशासकीय अहवाल तयार करू शकतात.

# बिझनेस





## फक्त 5,000 रुपयांची गुंतवणूक, आता करोडोंची उलाढाल

### पूजा बलानीचे नशीब असे उजळले...

**जोधपूरची पूजा बलानी हिने असे काही केले आहे, की जे लोकांना केवळ अशक्यच वाटेल. ती 'मिस चीजकेक' नावाच्या स्टार्टअपची संस्थापक आहे. तिने २०२३ मध्ये नरपत सिंह राठोडसोबत या स्टार्टअपची सुरुवात केली. हेच वर्ष होते जेव्हा तिच्यावर कुटुंबाकडून लग्नासाठी दबाव वाढत होता. पण आयुष्यात अचानक आलेल्या एका वळणाने सगळं बदलून टाकलं. तिने एका ट्रिप दरम्यान पहिल्यांदाच चीजकेक चाखला. त्याच क्षणी तिला जाणवलं की ही चव जोधपूरसाठी अजूनही अपरिचित आहे. जोधपूरसारख्या पारंपारिक शहरात तिने एका नवीन चवीचा पाया रचला. रीलच्या जादूने तिच्या आकर्षणात भर घातली. ५,००० रुपयांपासून सुरू झालेला पूजाचा प्रवास 'शार्क टँक' पर्यंत पोहोचला. आज तिच्या स्टार्टअपची उलाढाल कोट्यवधींमध्ये आहे. पूजा बलानीच्या यशाच्या प्रवासाबद्दल जाणून घेऊया...**

### 5,000 रुपयांच्या बचतीपासून सुरुवात

२०२३ मध्ये पूजा बलानीच्या आयुष्यात मोठे वळण आले. एमसीएचा अभ्यास आणि मार्केटिंगची नोकरी सोडल्यानंतर लग्न करण्यासाठी कुटुंबाचा दबाव वाढू लागला. त्यावेळी ती २५ वर्षांची होती. जयपूरच्या एका सहलीदरम्यान, तिने पहिल्यांदाच चीजकेक चाखला. तिला जाणवले की ही चव जोधपूरमध्ये अद्याप प्रसिद्ध नव्हती. तिच्या ५,००० रुपयांच्या बचतीचा वापर करून तिने तिच्या स्वयंपाकघरात प्रयोग करायला सुरुवात केली. कोणत्याही व्यावसायिक प्रशिक्षणाशिवाय केवळ YouTube आणि पुस्तकांवर अवलंबून राहून तिने चीजकेक बनवायला शिकले. त्यानंतर मित्रांच्या मदतीने ते विकण्यास सुरुवात केली.

### अपघाताने वेगाला केले खंडित

पूजाच्या प्रवासात तिचा मित्र आणि सह-संस्थापक नरपत सिंग राठोड याने महत्त्वाची भूमिका बजावली. नोव्हेंबर २०२३ मध्ये तिने तिच्या स्टार्टअपमधून फक्त ७,००० रुपये कमावले. तथापि, हळूहळू प्रवासाला गती मिळू लागली. मात्र जानेवारी २०२४ मध्ये झालेल्या एका गंभीर कार अपघातामुळे ही गती थांबली. पूजाला डोक्याला दुखापत झाली आणि तिचा हात फ्रॅक्चर झाला, ज्यामुळे ती दोन महिने अंथरुणाला खिळून राहिली. पण हार मानण्याऐवजी, तिची आई आणि नरपत यांनी त्यांचे काम सुरू ठेवले. मे २०२४ मध्ये त्यांनी १०० चौरस फूट जागेत त्यांचे पहिले स्टोअर उघडले. त्याचे उद्घाटन तिच्या वडिलांनी केले.

### सोशल मीडिया बनतो शक्ती...



सोशल मीडियाने खऱ्या अर्थाने पूजाच्या उपक्रमाला ताकद दिली. पूजा आणि नरपत यांनी इंस्टाग्राम रील्सद्वारे त्यांच्या स्टोअरच्या संघर्षांबद्दल माहिती दिली. यापैकी एका व्हिडिओला ६१ दशलक्षाहून अधिक व्ह्यूज मिळाले. या डिजिटल लोकप्रियतेमुळे ग्राहकांची गर्दी वाढली. २०२५ मध्ये ते शार्क टँक इंडिया सीझन ४ मध्ये दिसले. करार तिथे अंतिम झाला नसला तरी, राष्ट्रीय टेलिव्हिजनवर दिसल्यानंतर ब्रँडचे मूल्य लक्षणीयरीत्या वाढले. त्यांच्या इक्विटीचे रक्षण करण्यासाठी त्यांनी ते एकटे करण्याचा निर्णय घेतला.

### 3 कोटींच्या उलाढालीचे लक्ष्य

पूजाच्या स्टार्टअपने जोधपूर आणि जयपूरमध्ये स्वतःची स्थापना केली आहे. २०२५ मध्ये मिस चीजकेकने १ कोटी २० लाख रुपयांची कमाई केली. २०२६ चे लक्ष्य ३ कोटी आहे. पूजाने शेफ-लेस मॉडेल स्वीकारले आहे. ती तिच्या लहान टीमसह, बहुतेक महिलांसह, वैयक्तिकरित्या अंडी-लेस आणि शाकाहारी चीजकेक बनवते. एकेकाळी तिच्या लग्नाची घाई करणारे कुटुंब आता तिच्या यशाचा अभिमान बाळगते.

## फक्त तीन वेळा ईएमआय चुकले अन् 1.2 कोटी किमतीचा गमावला फ्लॅट!

### 8 वर्षांचे पेमेंट वाया गेले, पूर्ण कहानीच चक्रावणारी




**चार्टर्ड अकाउंटंट (सीए) मीनल गोयल यांनी त्यांच्या शेजाऱ्याची कहाणी सांगितली. तीन वेळा ईएमआय पेमेंट चुकवणे या शेजाऱ्याला इतके महागात पडले, की त्याने त्याचा १.२० कोटी रुपयांचा फ्लॅट गमावला. बँकेने ही मालमत्ता परत मिळवली आणि नंतर फक्त ९५ लाख रुपयांत लिलाव केली. सीएने सांगितलेली ही कहाणी आर्थिक नियोजन आणि आपत्कालीन निधी राखण्याच्या महत्त्वाबद्दल इशारा देते.**

सीए मीनल गोयल यांनी लिंक्डइनवरील पोस्टमध्ये म्हटले, की त्यांचा शेजारी राजेश ऑक्टोबर २०२५ मध्ये नोकरीवरून काढून टाकण्यात आला. जानेवारी २०२६ पर्यंत, त्याने तीन ईएमआय पेमेंट चुकवले होते. बँकेने राजेशला SARFAESI कायद्यांतर्गत नोटीस पाठवली. ६० दिवसांच्या आत बँकेने त्याचा फ्लॅट लिलाव केला.

**आठ वर्षे ईएमआय भरले होते...**

मीनल गोयल म्हणाल्या, की या घटनेमुळे हे लक्षात आले की कर्ज पूर्णपणे फेडल्याशिवाय घरावर मालकी हक्क आपला नसतो. तोपर्यंत ते फक्त बँकेकडून भाड्याने घेतलेले घर असते. गोयल यांनी आता घर खरेदीदारांना आपत्कालीन परिस्थितीसाठी पुरेसा निधी ठेवण्याचा सल्ला दिला. अशाच परिस्थितीत, बँकेशी स्पष्टपणे बोला आणि कर्जाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न करा.

### आपत्कालीन निधी उभारण्याचे महत्त्व

ही पोस्ट दोन आठवड्यांपूर्वी लिंक्डइनवर शेअर करण्यात आली होती. तथापि, एका वापरकर्त्याने 'एक्स' सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर याबद्दल पोस्ट केल्यानंतर ही कथा पुन्हा समोर आली आहे. या घटनेबद्दल लिहिताना, अमित अरोरा यांनी म्हटले आहे की, ही दुर्दैवी घटना आपत्कालीन निधी राखण्याचे महत्त्व, नोकरी गमावण्याशी संबंधित संभाव्य धोके आणि बेरोजगारीच्या काळात गृहकर्जामुळे निर्माण होणारा प्रचंड दबाव याची स्पष्ट आठवण करून देते. मात्र अनेकांना पोस्टच्या सत्यतेवर शंका होती. एका X वापरकर्त्याने लिहिले की, या उदाहरणात अनेक त्रुटी आहेत. पहिले म्हणजे, बेंगळुरूमधील फक्त ८ वर्षे जुने अपार्टमेंट प्रत्यक्ष किमतीपेक्षा कमी किमतीत विकले जात आहे यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. ९० दिवसांच्या डिफॉल्टनंतर बँकांनी ३ महिन्यांची मुदतवाढ देणे आणि लगेच कायदा लागू न करणे हे खूप सामान्य आहे. दुसऱ्याने म्हटले आहे की, ही खोटी माहिती आहे. लिलाव ६० दिवसांनंतर कधीही होऊ शकत नाही. जर तुम्ही ६ महिने लिहिले असते तर मी त्यावर विश्वास ठेवला असता. तुम्ही येथे खोटी माहिती का पसरवत आहात ?

# मुक्त शिक्षण प्रणालीमुळे शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना संधी मिळण्यास मदत –मुख्यमंत्री फडणवीस

## ‘एज्युकेट गर्ल्स’ संस्थेसोबत शासनाचा सामंजस्य करार

**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्यातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये ही राज्य शासनाची भूमिका आहे. ‘एज्युकेट गर्ल्स’सारख्या अनुभवी संस्थेच्या सहकार्यामुळे राज्य मुक्त शाळा प्रणाली अधिक बळकट होईल आणि शिक्षण अर्धवट राहिलेल्या विशेषतः मुलींना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

राज्यातील मुक्त शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि औपचारिक शिक्षण प्रणालीमधून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना लवचिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या पुढाकाराने शालेय शिक्षण विभागाने ‘एज्युकेट गर्ल्स’ संस्थेशी नुकताच सामंजस्य करार केला आहे.

राज्यात प्रत्येकाला शालेय शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कायम आग्रही आहेत. यादृष्टीने शालेय शिक्षण विभागामार्फत पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी संस्थांना देखील नोंदणी करणे बंधनकारक करण्यात येत आहे. पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शिक्षणापर्यंत विद्यार्थीसंख्या कायम राहावी यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तथापि कोणत्याही कारणास्तव शालाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी देखील प्रयत्न करण्यात येत आहेत. मुख्यमंत्र्यांनी या बाबीला प्राधान्य दिले असल्याने विशेषत: शिक्षणापासून दूर राहिलेल्या मुली, महिला यांना या कराराचा विशेष लाभ होणार आहे. ‘एज्युकेट गर्ल्स’ ही आशियातील सर्वोच्च सन्मान मानल्या जाणाऱ्या रमण मॅगसेसे पुरस्काराने गौरविण्यात आलेली संस्था असून मुलींच्या शिक्षणासाठी प्रभावी कार्य करणाऱ्या अग्रगण्य स्वयंसेवी संस्थांपैकी एक आहे. मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीमुळे या संस्थेसमवेत झालेल्या या करारामुळे राज्यातील मुक्त शिक्षण प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध होणार आहे. या भागीदारी अंतर्गत महाराष्ट्र राज्य मुक्त शाळा मंडळाला सहाय्य करण्यासाठी ‘टेक्निकल असिस्टन्स युनिट’ स्थापन करण्यात येणार आहे. या माध्यमातून जनजागृती मोहिमा राबविणे, वंचित समुदायांपर्यंत पोहोचणे, तसेच दहावी व बारावीचे शिक्षण पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांची ओळख पटवून त्यांना पुन्हा शिक्षणात सामावून घेण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यास मदत केली जाणार आहे.

या उपक्रमात विशेषतः मुली, महिला विद्यार्थी तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांपर्यंत पोहोचण्यावर भर दिला जाणार आहे. त्याचप्रमाणे मुक्त शिक्षण प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी शैक्षणिक संसाधने आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षण व्यवस्था विकसित करण्याबरोबरच मुक्त शिक्षण कार्यक्रमांची गुणवत्ता सुधारण्यासाठी नवकल्पनात्मक पद्धती विकसित करण्यात येतील. याशिवाय विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजना, शिष्यवृत्ती, शुल्क सवलती तसेच कौशल्याधारित अभ्यासक्रमांशी जोडण्याच्या संधींचाही शोध घेतला जाणार आहे.

# शालेय पोषण आहार पुरवणाऱ्या संस्थांना येत्या ३० एप्रिलपर्यंत गॅस सिलिंडरचा पुरवठा



**मुंबई(प्रतिनिधी)**–प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शिजविलेला आहार पुरवठा करणा-या महिला सेवाभावी संस्थांना पोषण आहार शिजविण्याकरिता अखंडितपणे एल. पी. जी. गॅस पुरवठा मिळावा यासाठी महापालिका शिक्षण विभागाने शिधावाटप नियंत्रक आणि नागरी पुरवठा संचालक यांना पत्र पाठवले आहे. महापालिका प्राथमिक आणि माध्यमिक शाळा तसेच खासगी प्राथमिक शाळा यांना पोषण आहार पुरवणाऱ्या संस्थांना किमान एप्रिल २०२६ अखेर पर्यंत एल.पी.जी. गॅस पुरवठा करण्याचे निर्देश संबंधित गॅस पुरवठा करणा-या आस्थापनांना तथा कंपनीस देण्यात यावेत अशी मागणी शिक्षण विभागाने रेशनिंग अधिकाऱ्यांकडे केली आहे.

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून या योजने अंतर्गत केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत मुंबईतील शाळांमधील इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वीच्या ५ लाख ४० हजार विद्यार्थ्यांना शिजविलेल्या आहाराचा पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेकडून पात्र ठरविण्यात आलेल्या १४७ संस्थांमार्फत शिजवलेल्या आहाराचा पुरवठा केला जात आहे.

सध्या जागतिक युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर १० मार्च २०२६ पासून पात्र सर्व सेवाभावी संस्थांना व्यावसायिक गटामध्ये गृहित धरून हिंदुस्तान पेट्रोलियम व भारत गॅस संस्था यांनी एल.पी.जी. गॅस सिलेंडर देण्यास मनाई केलेली आहे.

घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा व्यावसायिक ठिकाणी न करणेबाबत राज्याच्या शिधावाटप अधिकारी यांजकडून एल. पी. जी. गॅस सिलेंडर पुरवठा करणाऱ्या संस्थांना तसे पत्र देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे १० मार्च २०२६ रोजी सर्व संस्थांनी याबाबत मुंबई महानगरपालिकेच्या पी. एम. पोषण विभागास दूरध्वनीद्वारे तसेच प्रत्यक्ष संपर्क करून सदर बाबतची माहिती दिलेली आहे. तसेच ही गॅस टंचाई पुढील किमान एक ते दीड महिना असण्याची माहिती संस्थांना गॅस पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून मौखिकरित्या मिळालेली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत विद्यार्थ्यांना शिजवलेला आहार पुरवठा कसा करावा हा प्रश्न या सर्व सेवाभावी संस्थांसमोर उभा राहिला आहे.

# सुप्रीम कोर्टाची इच्छामरणाची परवानगी, ३१ वर्षीय हरिश राणा शेवटच्या प्रवासाला निघाला; तब्बल १३ वर्षांच्या शारीरिक क्लेशातून मुक्त होणार

**नवीदिल्ली (प्रतिनिधी)** – गाझियाबादमध्ये १३ वर्षांपासून कोमात असलेल्या ३१ वर्षीय हरीश राणाला दिल्लीतील एम्समध्ये हलवण्यात आले आहे. तथापि, कुटुंबाने अत्यंत गुप्ततेने हस्तांतरण हाताळलं आहे. शेजारी आणि सोसायटी सदस्यांनाही माहिती देण्यात आली नाही. गाझियाबादच्या राज एम्पायर सोसायटीच्या अधिकाऱ्यांनाही माहिती देण्यात आली नाही. शनिवारी सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांचा फ्लॅट बंद होता. एका जवळच्या मित्राने सांगितले की कुटुंबातील सदस्यांनी हरिशला खासगी वाहनातून नेले.

हरीशला गाझियाबादमधील भाड्याच्या फ्लॅटमधून एम्समध्ये नेण्यात आले तेव्हा आई, धाकटा भाऊ आणि बहीण भावुक झाले. आई आणि वडील अशोक राणा म्हणाले, आम्ही सर्वांची माफी मागतो; देवाने आम्हाला हे साक्षीदार म्हणून दिले आहे. आमचा मुलगा कुठेही असो, तो कोणत्याही मरणोत्तर जीवनात असो, आम्ही त्याला कधीही विसरणार नाही. आमचे जवळचे लोक, नातेवाईक, डॉक्टर, न्यायालयात आमचे प्रतिनिधित्व करणारे वकील आणि इतर सर्वांनी आम्हाला खूप पाठिंबा दिला. सर्वांच्या पाठिंब्याबद्दल आम्ही आभारी आहोत. एम्समध्ये हलवल्यानंतर, बहीण संध्याकाळी उशिरा फ्लॅटवर परतली. भावाने आणि कुटुंबातील इतर सदस्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. एम्सचा एक व्हिडिओही समोर आला आहे. संपूर्ण प्रक्रियेनंतर, त्याची लाईफ सपोर्ट सिस्टीम काढून टाकली जाईल, त्यानंतर इच्छामरण मंजूर केले जाईल. १३ वर्षांपासून कोणीही हरीशला बरे करू शकलेले नाही.

अवघा ३१ वर्षीय हरीश राणा हा पंजाब विद्यापीठाचा विद्यार्थी होता. २०१३ मध्ये तो एका ’पीजी’ (झञ्च) इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडला आणि त्याच्या मेंदूला अत्यंत गंभीर दुखापत झाली. तेव्हापासून गेल्या १३ वर्षांपासून तो ‘व्हेजिटेटिव्ह स्टेट’मध्ये कोणतीही हालचाल नसलेल्या अवस्थेत अंथरुणावर खिळून होता. श्वासोच्छ्वासासाठी त्याच्या गळ्याला नळी आणि अन्न भरवण्यासाठी पोटाला नळी लावण्यात आली होती. त्याच्या प्रकृतीत १३ वर्षांत कोणतीही सुधारणा झाली नाही.

ब्रह्माकुमारींशी संबंधित राणा कुटुंब

ब्रह्माकुमारींशी संबंधित राणा कुटुंबाने दीदींशी त्यांचे दुःख शेअर केले आणि त्यांनी वकील पाठवला. राणा म्हणाले, उच्च न्यायालयाने आमची याचिका फेटाळली, परंतु सर्वोच्च न्यायालयाने ती मंजूर केली, हरीशवर एक मोठा उपकार केला. आम्ही त्याचे दुःख सहन करू शकत नाही, त्याला काय त्रास देत आहे हे देखील स्पष्ट करू शकत नाही हे असहाय्य आहे. आजही दीदी पोहोचताच हरीशला म्हणाल्या की, सबको माफ करते हुये सबसे माफ़ी मांगते हुये अब जाओ, ठीक है यावेळी हरिश निष्पाप चेहऱ्याने डोळ्यांची उघडझाप करत पाहताना अनेकांना अश्रु दाटून आले.

हरिशने दुःख व्यक्तही केले नाही

तो आमचा मुलगा आहे, आम्ही त्याची काळजी घेत आहोत आणि जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत आम्ही ते करत राहू. न्यायालयाच्या निर्णयानंतर, एम्सने सर्व तयारी केली आहे. आम्हाला याला निष्क्रिय (पॅसिव्ह) इच्छामरण म्हणायचेही नाही. आम्ही त्याला देवाच्या मांडीवर सोडत आहोत. आम्ही त्याला अनुभवी डॉक्टरांकडे सोडत आहोत जे त्याला प्राणघातक इंजेक्शन देणार नाहीत. त्याऐवजी, ते नैसर्गिक मृत्यूची सोय करतील. एम्समध्ये, अनुभवी डॉक्टरांच्या देखरेखीखाली, आम्ही फक्त अन्नपुरवठा करणारी पाईप काढून टाकू. आम्ही त्याला पाणी देत राहू, अगदी उपवास करणाऱ्या व्यक्तीप्रमाणे. जेव्हा हरीशचे निधन होईल, तेव्हा आम्ही त्याला घरी आणू आणि त्याला अंतिम निरोप देऊ. एकच दुःख म्हणजे त्याने त्याचे दुःख व्यक्तही केले नाही. सकाळी आणि संध्याकाळी, जेव्हा मी त्याला मालिश करतो तेव्हा मी त्याला घरून गोष्टी सांगायचो, त्या दिवशी काय घडले ते सांगायचो. कधीकधी मी तासन्तास तो फक्त एकदाच डोळे मिचकावून वाट पाहत असे जेणेकरून मला वाटेल की तो सर्वकाही ऐकतो. कधी तो जांभई देत असे, कधी शिंकत असे किंवा त्याच्या डोळ्यांभोवतीची त्वचा मुरगळत असे आणि तो जिवंत आहे हे पाहून आम्हाला आराम वाटायचा.

# गॅसच्या अडचणीला दूर करीत संभाजीनगरात आयटी पार्कमध्ये सौरऊर्जेवर शिजतेय ४० हजार विद्यार्थ्यांची खिचडी



**छ. संभाजीनगर(प्रतिनिधी)**–छत्रपती संभाजीनगरमध्ये शालेय पोषण आहार तयार करण्यासाठी सौरऊर्जेचा वापर करणारे एक वेगळे मॉडेल समोर आले आहे. चिकलठाणा औद्योगिक परिसरातील आय टी पार्कमध्ये उभारलेल्या सामुदायिक स्वयंपाकघरात दररोज हजारो विद्यार्थ्यांसाठी खिचडी आणि इतर आहार तयार केला जातो. विशेष म्हणजे येथे एलपीजी गॅस सिलिंडरवर अवलंबून न राहता वाफेची यंत्रणा आणि सौरऊर्जा वापरली जाते. त्यामुळे गॅस टंचाईचा परिणाम या स्वयंपाकघरावर होत नाही. या उपक्रमामुळे कमी वेळेत मोठ्या प्रमाणात अन्न शिजवता येते आणि पोषणमूल्येही जपली जातात. जिल्ह्यातील शाळांपर्यंत पोषण आहार पोहोचवण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

चिकलठाणा औद्योगिक परिसरातील आय टी पार्कमध्ये उभारलेल्या सामुदायिक स्वयंपाकघरात वाफेवर चालणारी आधुनिक यंत्रणा बसवण्यात आली आहे. सौरऊर्जेच्या मदतीने तयार होणाऱ्या वाफेवर मोठ्या प्रमाणात खिचडी आणि इतर पदार्थ शिजवले जातात. त्यामुळे एलपीजी गॅस सिलिंडरचा वापर मोठ्या प्रमाणात टाळला जात आहे.

या स्वयंपाकघरातून दररोज सुमारे ३५ ते ४० हजार विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार तयार केला जातो. शहरी भागातील सुमारे १६८ शाळांमधील ३८ हजार विद्यार्थी आणि ८० बालवाड्यांमधील ३५०० बालकांपर्यंत हा आहार पोहोचवला जातो. स्वयंपाक झाल्यानंतर विशेष वाहनांच्या माध्यमातून शाळांमध्ये हा आहार वितरित केला जातो.

या उपक्रमाचा फायदा केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर इतरांनाही होत आहे. शासकीय कर्करोग रुग्णालयातील रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी दररोज जेवणाची सोय येथे करण्यात येते. त्यामुळे सामुदायिक स्वयंपाकघर सामाजिक उपक्रमाचेही केंद्र ठरत आहे.

या प्रकल्पाबाबत बोलताना आय टी पार्कचे मॅनेजर ’सुदर्शन पोटभरे’ म्हणाले, सौरऊर्जा आणि वाफेच्या यंत्रणेमुळे मोठ्या प्रमाणात अन्न कमी वेळात तयार करता येते. त्यामुळे एलपीजीवर अवलंबित्व कमी झाले असून खर्चही कमी झाला आहे.

दरम्यान एलपीजी गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील अष्टविनायकांपैकी एक असलेल्या ओझर येथील विघ्नहर देवस्थानानेही पर्यायी मार्ग स्वीकारला आहे. मंदिर परिसरात उरलेल्या अन्न आणि सेंद्रिय कचऱ्यापासून बायोगॅस तयार केला जातो. या गॅसचा वापर मंदिरातील अन्नप्रसाद आणि स्वयंपाकासाठी केला जात आहे.

गॅस तुटवड्याच्या काळात हा बायोगॅस प्रकल्प अनेकांसाठी आदर्श ठरत आहे. कमी खर्चात स्वच्छ इंधन तयार होत असल्याने ग्रामीण भागातील संस्थांसाठी हा एक पर्यावरणपूरक आणि टिकाऊ पर्याय ठरू शकतो.

# संकटात भारताकडूनच शेजारी देशाला मदतीचा हात; बांगलादेशला तब्बल ४० हजार टन इंधनाचा पुरवठा करणार

**नवीदिल्ली (प्रतिनिधी)** –शेख हसीना यांचे सरकार कोसळल्यानंतर बांगलादेशाने भारताविरुद्ध कुरापती केल्या. मात्र आता संकटाच्या काळात भारताने मदतीचा हात पुढे केला आहे. बांगलादेशला ४० हजार टन इंधनाचा पुरवठा करणार आहे.

बांगलादेश ने भारताकडून अतिरिक्त ४०,००० टन डिझेल आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हा पुरवठा एप्रिल पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. बांगलादेश पेट्रोलियम कॉर्पोरेशनचे अधिकारी चव. चीीहशव कीरळप रव याने सांगितले की, अलीकडे भारताकडून ५,००० टन डिझेल बांगलादेशमध्ये पोहोचला आहे आणि मार्चच्या मध्यापर्यंत अशीच आणखी एक खेप येण्यास आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, भारताकडून ४०,००० टन अतिरिक्त डिझेल आयात करण्याचा प्रस्ताव मिळाला आहे. एलसी (लेटर ऑफ क्रेडिट) आणि इतर औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर हे इंधन एप्रिलपर्यंत बांगलादेशमध्ये पोहोचेल. भारत आणि बांगलादेश यामध्ये पूर्वी डिझेल रेल्वे वॅगनद्वारे पाठवले जात असे. परंतु मार्च २०२३ मध्ये सुरू झालेल्या BangladeshIndia Friendship Pipeline मुळे पुरवठा अधिक जलद झाला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन बांग्लादेशाचे प्रधानमंत्री शेख हसीना आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्तपणे केले होते.

**आसमच्या रिफायनरीमधून बांगलादेशपर्यंत डिझेल**

या पाईपलाइनद्वारे भारताच्या Numaligarh Refinery Limited (आसाम) कडून बांग्लादेशच्या पार्वतीपूर डेपोपर्यंत पोहोचवला जातो. हा प्रकल्प दोन्ही देशांमधील ऊर्जा सहकाराचा एक मोठा उदाहरण मानला जातो. रिपोटनुसार, अंतरिम सरकारच्या काळात पाईपलाइनमधून डिझेल आयात काही काळासाठी थांबवण्यात आले होते. परंतु नवीन सरकार येण्याच्या नंतर अलीकडे ५,००० टन डिझेलच्या खेपसह पुरवठा पुन्हा सुरू केला आहे. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे बांग्लादेशमध्ये काही काळासाठी पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी दिसून आली. सरकारने खरेदीवर नियंत्रण ठेवण्यासाठी इंधन विक्रीवर राशनिंग लागू केले होते, जे आता काढण्यात आले आहे जेणेकरून लोक ईदच्या आधी सोयीने प्रवास करू शकतील. होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी वाहतूकीवर इराणने निर्बंध लादले असल्याने अनेक देशांमध्ये इंधनाची तुटवडा जाणवत आहे. दरम्यान भारताच्या दोन जहाजांनी अलिकडेच होर्मुझ सामुद्रधुनीतून गुजरातच्या दिशेने मार्गक्रमण केले आहे. त्यामुळे येत्या काळात भारतात होणारी वाहतूक सुरळीत होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# धाराशिवमध्ये भीषण अपघात, तीन जणांचा मृत्यू, २ गंभीर

**धाराशिव(प्रतिनिधी)**–राज्यातील रस्ते अपघातांची मालिका सुरू असल्याचं दिसून येत आहे. गेल्याच आठवड्यात लातूरमध्ये भीषण अपघातात ४ जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाचा आता धाराशिवमध्येही भीषण अपघाताची घटना घडली. लातूरतुळजापूर महामार्गावर अपघात घडून तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. पाटोदा येथील पुलावर तीन वाहनांची जोरदार धडक झाली. या धडकेत वाहनातील तिघांचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत मतदकार्य सुरू केलं, तसेच पोलिसांनाही कळविण्यात आलं.

वाहनांची धडक इतकी तीव्र होती की, अपघातात तीन जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तसेच दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढण्यास मदत केली. तर, पोलिसांनीही माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेत पंचनामा करण्यास सुरुवात केली.

**Change In Name**

My old Name is BALAJI NAMDEV RATHOD Which now I am changing as New Name BALAJI NAMDEVRAO RATHOD Hence forth My all correspondence will be done as per My Name please consider the same Address. BALAJI NAMDEVRAO RATHOD S/O Rathod Namdev Bhayegao Road Anand Nagar Degloor vtc Deglur Po Degloor,Nanded -431717, Maharashtra,INDIA

Mob. No- 8956246324

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८

## गॅस टंचाईमुळे ‘पार्ले-जी’ बिस्कीटचे उत्पादन ठप्प

**बुलडाणा (प्रतिनिधी)** – आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद आता थेट स्थानिक उद्योगांवर उमटू लागले आहेत. बुलढाणा जिल्ह्याच्या खामगाव येथील ’शिवांगी बेकर्स’ कंपनी ही प्रसिद्ध ’पार्ले-जी’ बिस्किटांचे उत्पादन करते. ती कंपनी गॅसच्या तीव्र टंचाईमुळे गेल्या गुरुवारपासून बंद पडली आहे. यामुळे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. यामुळे शेकडो कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शिवांगी बेकर्समध्ये प्रामुख्याने ’क्रीम’ आणि ’ग्लुकोज’ बिस्किटांचे उत्पादन घेतले जाते. येथील बिस्किट बनवण्याचे ओव्हन पूर्णपणे गॅसवर चालतात. मात्र युद्धाच्या संकटा-मुळे व्यावसायिक गॅस पुरवठ्यावर मर्यादा आल्या आहेत. परिणामी कंपनीला आवश्यक असलेला गॅस पुरवठा खंडित झाला आहे. ग्लुकोज ओव्हनसह संपूर्ण उत्पादन प्रक्रिया थांबवावी लागली आहे.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक

**नांदेड(प्रतिनिधी)**–प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची अंमलबजावणी करताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी १ लाख ८ हजार घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्र राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

महिना तीनशे युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य व्हावे व अतिरिक्त वीज विकून त्यांना उत्पन्नही मिळावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने ही योजना सुरू केली आहे. सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या थेट उपयोगाच्या या योजनेच्या अंमलबजावणीवर भर देण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

केंद्र सरकारने गेल्या पाच महिन्यांतील योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांपैकी किती अर्जदारांच्या घरी सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले, याचा विचार करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र १ लाख ८ हजार ३२७ स्थापित सौरऊर्जा प्रकल्पांसह पहिल्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (९५ हजार ६६५), गुजरात (९४ हजार ३६४), राजस्थान (३९ हजार ४८४) व केरळ (३६ हजार ८३६) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या क्रमांकावर आहेत. देशामध्ये या कालावधीत प्राप्त अर्जांपैकी एकूण ५ लाख ५७ हजार २२४ घरगुती ग्राहकांकडे सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले. त्यापैकी १९ टक्के प्रकल्प महाराष्ट्रात बसविण्यात आले.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरगुती ग्राहकांना छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान थेट दिले जाते. ऊर्वरित रक्कम लाभार्थी वीजग्राहकाने भरायची असते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज निर्माण होते. छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पातून ग्राहकाच्या गरजेपेक्षा जास्त वीज निर्माण झाल्यामुळे त्याचे बिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज विकून त्याला उत्पन्नही मिळते. एकदा सौरऊर्जा प्रकल्प बसविला की त्यातून २५ वर्षे वीजनिर्मिती होते.

केंद्र सरकारतर्फे ग्राहकांना मिळणाऱ्या अनुदानात राज्य सरकारतर्फे आणखी भर घालून राज्यातील दारिद्र्य रेषेखालील आणि महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापर असलेल्या गरीब गटातील एकूण पाच लाख वीज ग्राहकांसाठी स्मार्ट योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या निविदेत प्रती किलोवॅट केवळ ४५,४९५ रुपये इतका खर्च निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे तसेच केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदानामुळे या ग्राहकांना खूपच कमी लाभार्थी हिस्सा भरून मोफत वीज मिळविता येणार आहे.

**GYAN MATA VIDYA VIHAR**

Near Airport, Kamtha Road, Nanded (MS)-431605

(CBSE Affiliation No. 1130194)

Email: gyanmata1988@gmail.com, Ph: 8275052380

**Teachers Required**

Qualified, trained & experienced female Teachers with fluency in English & computer knowledge are required for the post of Primary Teacher (all subjects) for the academic session 2026-27. Interested candidates can mail the CV along with application to gyanmata1988@gmail.com by 28th March 2026. Salary will be negotiable.

Principal

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



### पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाची कारवाई

# जुगार अड्डा व अवैध रेती वाहतुकीविरुद्ध कारवाई करत ३२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर भागात रवाना केले होते. या पथकाने शनिवार, दि. १४ मार्च रोजी हिमायतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गंगाधर दंडेवाड यांचे शेतात जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत २७,००० रुपयांची रोकड, ४ मोबाईल व ३ मोटारसायकली असा एकूण १,८१,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



या प्रकरणात एकूण ४ आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांचेविरुद्ध हिमायतनगर पोलीस ठाणे येथे गुरनं ७२/२०२६ कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हिमायतनगर पोलीस ठाण्यातील पोहेकॉ/ दिलीप जाधव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या पथकाने भोकर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रिठा ते भोकर रोडवर अवैधरित्या रेतीवाहतूक करणाऱ्या हायवावर कारवाई करत, रुपये ३० लाख किंमतीचा भारत बेंज कंपनीचा एक हायवा व २५ हजार रुपयांची ५ ब्रास रेती असा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात एका आरोपीस ताब्यात घेऊन त्याच्याविरुध्द भोकर पोलीस ठाणे येथे गुरनं ११८/२०२६ कलम ३०३ (२), ३(५) भा. न्या. सं. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा तपास भोकर पोलीस ठाण्यातील पोहेकॉ. तुकाराम केंद्रे हे करीत आहेत. या दोन्ही कारवायांत पथकाने एकूण २७ हजार रुपयांची रोकड, ४ मोबाईल, ३ मोटारसायकली, १ हायवा व ५ ब्रास वाळू असा एकूण ३२ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

**आजपासून गुटखाविरुद्ध मोहीम**

परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत, १६ ते ३० मार्चदरम्यान गुटखाविरोधी मोहीम राबविण्यात येणार आहे. यात स्वादिष्ट/ सुगंधित तंबाखू, अपमित्रकेयुक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट/ सुगंधित सुपारी, गुटखा, पानमसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण वितरण व वाहतूक या विरुद्ध कलम १२३ बी.एन.एस. प्रमाणे कारवाई करण्यात येणार आहे. या दरम्यान अशा पदार्थांची विक्री करणाऱ्या पानटपऱ्या व संभाव्य साठवणुकीची ठिकाणे यांच्या तपासण्याची मोहीम हाती घेण्यात येत असून, संबंधिताविरुद्ध कलम १२३ बीएनएस अन्वये करण्यात येणाऱ्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असल्याने व त्यास दहा वर्षे सक्तमजुरीसह द्रव्य दंडाची देखील शिक्षा असल्याने संबंधितांनी अशा पदार्थांच्या व्यवहारांपासून दूर राहणे हितावह राहील, असे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी निर्देश दिले आहेत.

परिक्षेत्रात चालणाऱ्या अवैध व्यवसायांची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचविणे नागरिकांना सोपे व्हावे म्हणून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली आहे. नागरिकांनी जागरूक होऊन, आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सअप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन शहाजी उमाप यांनी केले आहे.

## लोकअदालतीमध्ये महापालिकेने केली तब्बल ५.५८ कोटींची वसुली

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या लोकअदालतीमध्ये थकबाकीदारांकडून तब्बल ५.५८ कोटी मालमत्ता कराची वसुली करण्यात आली आहे.

नांदेड वाघाळा शहर महापालिकेने लोकआदालतीमध्ये आपल्या थकीत कराचा भरणा केल्यास शास्तीवरील रक्कमेत तब्बल ८० टक्के सूट जाहीर केली होती. या योजनेचा लाभ घेत एकूण ३७९९ मालमत्ताधारकांनी आपल्या थकित कराचा भरणा करून पालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी सहकार्य केले आहे.

मालमत्ता कर थकबाकीदारांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत तब्बल ३७९९ मालमत्ताधारकांनी मोठ्या प्रमाणात कर भरला असून, लोकअदालतीमध्ये प्रलंबित प्रकरणांवर तडजोड करून दंड आणि व्याजामध्ये नियमानुसार सवलत देण्यात आली, ज्यामुळे करदात्यांचा कल वसुलीकडे वाढल्याचे चित्र आहे. महापालिकेचा महसूल वाढवणे आणि थकीत कराची वसुली करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या प्रक्रियेत पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त गिरिश कदम, कर विभागाचे उपायुक्त अजितपालसिंघ संधु, सहाय्यक आयुक्त मनीषा नरसाळे आणि सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी महत्वाची भूमिका बजावली.

महापालिकेत १४ मार्च रोजी झालेल्या लोकअदालतीला मिळालेला प्रतिसाद पाहता ८०% शास्ती (दंड) सूट योजनेला २२ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय पालिकेने घेतला असून, शनिवार, दि. १४ मार्च रोजी झालेल्या लोकअदालतीमध्ये तांत्रिक बिघाडामुळे नागरिकांना ऑनलाइन स्वरूपात कर भरण्यास काही प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या असल्याकारणाने त्यांना पुनश्च संधी देण्याच्या दृष्टिकोनातून त्याचप्रमाणे कर भरण्यासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता आता ही सवलत योजना २२ मार्चपर्यंत सुरू राहील. ज्या नागरिकांचा मालमत्ता कर व पाणीपट्टी कर प्रलंबित आहे, त्यांना शास्तीमध्ये ८०% पर्यंत सूट मिळत आहे. नागरिकांनी या वाढीव मुदतीचा लाभ घेऊन आपला कर भरून कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.

## वेस्टन्स क्रिकेट असोसिएशनची टी-२० ट्रॉफी महाराष्ट्र संघाने जिंकली

**नांदेड (प्रतिनिधी)** –वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्र आयोजित वेस्ट झोन वेस्टन्स टी-२० क्रिकेट सामने नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी स्टेडियम येथे नुकतेच पार पडले. रविवारी शेवटच्या चौथ्या दिवशी महाराष्ट्र आणि विदर्भ या दोन क्रिकेट संघामध्ये अटीतटीचा सामना होऊन ४ धावांनी महाराष्ट्र संघाने यात विजय मिळविला.



नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंघजी स्टेडियम येथे मागील तीन दिवसांपासून या क्रिकेटच्या स्पर्धा सुरू असून, या स्पर्धेत विदर्भ, गोवा, महाराष्ट्र, मुंबई येथील प्रमुख क्रिकेटचे संघ सहभागी झाले होते. रविवारी अंतिम सामन्यामध्ये महाराष्ट्र विरूद्ध विदर्भ या दोन संघात सामना होऊन नाणेफेक विदर्भ संघाने जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण केले. २० षटकात ७ गडी बाद २३३ धावा महाराष्ट्र संघाने केल्या. यात खालीद जमान यांनी ३४ चेंडूत ७५ धावा, शेख सरदार यांनी २५ चेंडूत ४९ धावा, गोपाळ गुरखुडे यांनी २० चेंडूत ३९ धावा, तर विदर्भ संघाने शैलेंद्र ३ विकेट, राहुल, प्रितम, परिक्षित त्रीपाठी यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. तसेच विदर्भ संघाच्या वतीने २० षटकांत ४ बाद २२९ धावा काढल्या. त्यात शलभ श्रीवास्तव यांनी ४६ चेंडूत ८६ धावा, अनुप ३४ चेंडूत ५७ धावा, राहुल जाधव १३ चेंडूत ३५ धावा काढल्या. तर महाराष्ट्र क्रिकेट संघाने मोहन बडुरे २, शेख सादीक, सरदार १ यांनी विकेट घेतल्या. महाराष्ट्र संघाने ४ धावांनी सामना जिंकला. सामनावीर म्हणून खालेद इमान यांना बहुमान मिळाला. बेस्ट बॉलर म्हणून मोहन बडुरे, बेस्ट विकेट किपर आसिफ खान, तर मालिकावीर म्हणून साहील यांनी बहुमान मिळवला.

विजयी अंतिम क्रिकेट सामन्याचे बक्षीस वितरण बीव्हीसीचे सेक्रेटरी विनोद फडके, गोवा वेस्टन्स सेक्रेटरी सुदेश प्रभुदेसाई, टीसीएचे नईम भाई, वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्रचे अध्यक्ष उदयसिंह शिंदे, उपाध्यक्ष किशोरभैय्या जगताप, नांदेड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष अमजद अली, हैदराबाद क्रिकेट असोसिएशनचे नईमभाई आदींच्या उपस्थितीत ट्रॉफी व सन्मानचिन्ह विजेत्या संघाला देण्यात आले.

महाराष्ट्र क्रिकेट या विजयी संघाला वेस्टन्स क्रिकेट असोसिएशन्स फॉर महाराष्ट्र मॅनेजर तथा कोच महंमद फहीम यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी मागील चार दिवसांपासून शिस्तबद्ध सामने या मैदानावर खेळविले. त्यामुळे त्यांचे वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी यावेळी कौतुक केले.

## विद्युत तारांवर आकोडा टाकून विजचोरी; दोघांवर गुन्हा

**नरसीफाटा (प्रतिनिधी)** – विद्युत महावितरण कार्यालय नरसीच्या अंतर्गत ग्रामीण भागात विद्युत चोरी मोठ्या प्रमाणात होत आहे. विजचोरी रोखण्यासाठी महावितरणच्या भरारी पथकाने बिलोली तालुक्यातील किनाळा व रामतीर्थ येये छापा टाकला असता वीज वितरणच्या तारावर आकोडा टाकून वीज चोरी करताना दोघांना रंगेहात पकडून भोकर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षांपासून शहरासह ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात वीज चोरीचे प्रमाण वाढल्याने महावितरणला विद्युत गळतीमुळे आर्थिक नुकसानीला सामोरे जाण्याची वेळ आली होती. वीज चोरीवर आळा घालण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठांकडून भरारी पथकाची नेमणूक करून अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर जबाबदारी दिली होती.

महावितरणच्या नरसी येथील कार्यालयाचे सहायक शाखा अभियंता अक्षय वाकळे, जी. एस. कानगुले, भाये, मारकवाड, श्रीमती वाय. एस. सय्यद यांच्या पथकाने २४ डिसेंबर २०२५ रोजी रामतीर्थ येथे तपासणी करत असताना हणमंतराव शंकरराव तोडे रा. रामतीर्थ ता. बिलोली हे आपल्या स्वस्त धान्य दुकानाच्या वापरासाठी विद्युत वाहिनीच्या तारेवर आकोडा टाकून वीज चोरी करताना आढळून आले. त्यांनी २४२५० रु. वीज चोरी केली. तर २७ डिसेंबर २०२५ रोजी किनाळा ता. बिलोली येथे तपासणीत विठ्ठल आनंदा माने यांनी घरी वापरासाठी विद्युत तारांवर आकोडा टाकून २६१५ युनिट वीज चोरी केल्याचे आढळून आले. जवळपास ६८०३० रु. व तडजोड दंड ५०००० हजार असे एकूण १,१८,०३० वरील दोघांनाही कारवाई न करता रक्कम भरण्यासाठी लेखी देऊनही अद्याप पैसे भरले नसल्याने १३ मार्च २०२६ रोजी नरसी येथील महावितरण शाखेचे सहायक अभियंता अक्षय शिवाजी वाकळे यांनी भोकर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून वरील दोघांविरोधात वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'एमजीएम'च्या भाजलेल्या कर्मचाऱ्याचा अखेर मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील महात्मा गांधी मिशन संचालित अभियांत्रिकी महाविद्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी सुनील कुलकर्णी यांनी १३ मार्च रोजी त्यांच्या हक्काच्या पैशासाठी अंगावर पेट्रोल ओतून जाळून घेतले होते. अखेर त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी तुर्त आकस्मिक मृत्यूची नोंद झाली आहे.



महात्मा गांधी मिशन संचालित अभियांत्रिकी महाविद्यालयात (एमजीएम कॉलेज) सुनील रामकृष्ण कुलकर्णी (वय ६१) हे सेवक पदावरून सेवानिवृत्त झाले होते. त्यांचे महाविद्यालय प्रशासनाकडून सेवानिवृत्तीचे हक्काचे पैसे येणे होते. त्यासाठी त्यांनी अनेक वेळा महाविद्यालयात खेटे घातले, विनवणी केली, परंतु त्यांच्या हाती निराशा पडली. त्यांनी बाहेरून काही पैसे उधार घेतले होते. महाविद्यालयाच्या प्रशासनाने पैसे देताच ते त्यांचे पैसे चुकते करणार होते. त्यामुळे ते महाविद्यालय प्रशासनाकडून पैसे मिळण्यासाठी विनवणी करत होते. परंतु त्यांना न्याय मिळाला नाही. या संकटात सापडलेले कुलकर्णी हे अनेकांची उधारी देणे असल्यामुळे त्रस्त झाले होते.

कुलकर्णी यांनी एमजीएम प्रशासनाला सूचक इशारा देत १३ मार्च रोजी अंगावर पेट्रोल टाकून एमजीएम कॉलेजच्या प्रांगणात स्वतःवर पेट्रोल टाकून पेटवून घेतले. त्यांना उपचारासाठी आधार हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## पांडुरंग ऐगाडे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – दत्त गल्ली मुखेड येथील रहिवासी पांडुरंग इरबाजी ऐगाडे यांचे अल्पशा आजाराने रविवार, दि. १५ मार्च रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ५६ वर्षांचे होते.



कै. पांडुरंग ऐगाडे यांच्या पार्थिवावर रविवारी दुपारी मुखेड येथील समशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, २ बहिणी, शिवाजी व प्रकाश असे दोन भाऊ, भावजया असा परिवार आहे.

## के.आर.एम. महिला महाविद्यालयात अतिथी व्याख्यान संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –के.आर.एम. महिला महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागातर्फे अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. विजया देशमुख, प्रमुख वक्ते डॉ. महेंद्र बेंबळगे, अर्थशास्त्र विभागाच्या डॉ. आरती राणे, डॉ. योगिता पवार, प्रा. मनोज देशमुख, वाणिज्य विभागाच्या डॉ. सीमा शिंदे, डॉ. अग्रवाल व असंख्य विद्यार्थिनींची उपस्थिती होती.



यावेळी डॉ. महेंद्र बेंबळगे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात बाजार आणि बाजाराच्या प्रकारावर प्रकाश टाकला. प्राचार्या डॉ. विजया देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणात बाजार व्यवस्थेमध्ये ग्राहक हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. ग्राहकांच्या मागणीवरच बाजारातील वस्तू व सेवांचे उत्पादन आणि वितरण असते. त्यामुळे ग्राहक जितका जागृत आणि सजग असेल तितका बाजार अधिक पारदर्शक, प्रामाणिक आणि ग्राहकाभिमुख बनतो. जागृत ग्राहक हा सुशिक्षित आणि प्रामाणिक बाजार व्यवस्थेचा पाया आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपला हक्क व कर्तव्याची जाणीव ठेवून सजग ग्राहक बनणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले.

यावेळी सूत्रसंचालन डॉ. आरती राणे यांनी केले तर आभार प्रा. मनोज देशमुख यांनी मानले.

## पतंजली योग परिवारातर्फे गुरुवारी १११ कुंडी यज्ञ सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)** –पतंजली योग परिवार नांदेडतर्फे अशोक नगर हनुमान मंदिर येथे १११ कुंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार, दि. १९ मार्च रोजी सकाळी ५.३० ते ७ दरम्यान अशोक नगर हनुमान मंदिर येथे योग वर्ग होणार आहेत. त्यानंतर ७ ते ७.३० दरम्यान १११ कुंडी विश्वशांती प्रार्थना यज्ञ संपन्न होणार. या यज्ञ सोहळ्यासाठी सर्व योग साधक, योग शिक्षक, कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच आमदार बालाजीराव कल्याणकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी गुढी पूजन करून पारंपरिक पेय पन्हा/पछडा प्रसाद दिला जाणार आहे. तरी पतंजली योग परिवार नांदेडच्या सर्व योगप्रेमींनी या सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महिला दिनानिमित्त सोनखेड येथे महिलांचा सत्कार

**लोहा (प्रतिनिधी)** –जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोनखेड येथे नुकताच महिलांचा सनमान सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रणिताताई -देवरे चिखलीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात आला.

शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी लोहा तालुक्यातील मौ. सोनखेड येथे दि. ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे कर्तबगार महिलांचा सन्मान कार्यक्रमाचे आयोजन आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रणितिताताई देवरे-चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रणितिताताईचे शाळेच्या व ग्रामपंचायतच्या वतीने सत्कार करण्यात आला.




याप्रसंगी विस्तार अधिकारी अंजली कापसे, सरपंच संगीता रामदास इंगळे, ग्रामपंचायत सदस्य पद्मीनबाई पंजाबराव देशमुख, महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा मनीषा सुनील मोरे, शिल्पा सुभाष मोरे, श्रीमती संगीता दिगांबर फाजगे, पूजा भगवान मोरे, अश्विनी लक्ष्मण धुतराज, प्रभावती बाबुराव श्रीमंगले, सोनखेड येथील माजी सरपंच श्रीमती राजामती ज्ञानोबा मोरे, माजी सरपंच शशिकला नरवड, तसेच शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा लक्ष्मीताई गणेश पांचाळ, शुभांगीताई मोरे, मीराताई मोरे यांच्यासह अनेक महिलांची उपस्थिती होती.

याप्रसंगी भारतीय जवानांच्या पत्नी व आईंचा, पोलीस दलातील महिला, आरोग्य विभागात ज्या काम महिला, अंगणवाडीतील सर्व महिला शिक्षका, कष्टकरी महिलांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित महिलांना प्रणिताताई यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या संयोजिका जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या केंद्रीय मुख्याध्यापिका कविता मुदखेडे व त्यांच्या संपूर्ण चमूंचा देखील प्रणिताताई यांनी सन्मान केला.

## कुंडलवाडीत श्रीराम नवरात्र उत्सवाचे आयोजन

**कुंडलवाडी (वार्ताहर)** – कुंडलवाडी येथील श्रीराम मंदिर मठ संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या भक्तिभावात श्रीराम नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव चैत्र शुद्ध प्रतिपदा गुरुवार, दि. १९ मार्चपासून चैत्र शुद्ध नवमी गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ पर्यंत संपन्न होणार आहे.

समर्थ भक्त ह.भ.प. श्रीराम महाराज बाबामहाराज रामदासी यांच्या आशीर्वादाने हा उत्सव आयोजित करण्यात आला असून, परिसरातील सर्व रामभक्तांनी या उत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

उत्सवाच्या दरम्यान दररोज सकाळी ७ वाजता अभिषेक पूजन, सकाळी १० ते ११ हरिपाठ, तसेच ११ वाजता आरती होणार आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या वेळेत महाप्रसाद दिला जाणार आहे. दुपारी २ ते ५ या वेळेत रामकथेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता हरिपाठ, सायंकाळी ७ वाजता आरती, तसेच रात्री ९ ते ११ हरिभजन असा दररोजचा कार्यक्रम असणार आहे.



या नवरात्रोत्सवात रामकथा ह.भ.प. वै. शा. सं. प्रा. पिकेश महाराज विष्णुपुरीकर यांच्या प्रभावी प्रवचनातून होणार असून, कथेची वेळ दुपारी २ ते ५ अशी राहणार आहे. तसेच चैत्र शुद्ध नवमी गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता रामजन्म आख्यान होणार आहे. दुपारी १२ वाजता रामजन्म गुलाल कार्यक्रम, त्यानंतर पालखी मिरवणूक सोहळा आणि महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. हा उत्सव श्रीराम मंदिर मठ संस्थान, कुंडलवाडी येथे होणार असून, यासाठी मठपती स. भ. रघुवीर महाराज रामदासी (कुंडलवाडी) यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीराम नवरात्र उत्सवासाठी भक्तांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com